दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२३७ | शुक्रवार, दि.२० डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सदिच्छा भेटीत दडलंय काय ?

गारठून टाकणाऱ्या थंडीत नागपुरात मंगळवारी उद्धव ठाकरे व त्यांच्या २० आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आणि सभापती राहुल नार्वेकर यांची घेतलेली भेट ही सदिच्छा भेट म्हणून सांगितली जाते आहे. १२ तारखेला दिल्लीत अजित पवार यांनी शरद पवार यांचे दर्शन घेऊन त्यांना दिलेल्या शुभेच्छा यासुद्धा सदिच्छा मानल्या जात आहेत पण 'एक तर तू राहशील किंवा मी' अशी टोकाची कडवी भाषा आणि फडणवीसांच्या शपथविधीवर बहिष्कार टाकणारी मंडळी अचानक बदलतात तेव्हा काही ना काही गडबड असतेच असते. आग असली तरच धूर येतो, अगदी तसाच प्रकार या सदिच्छा भेटीत दिसून आला आहे.

## कुलगाममध्ये ५ दहशतवाद्यांना कंठस्नान

श्रीनगर: जम्मू–काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यात लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. कुलगाम जिल्ह्यातील कद्दर भागात झालेल्या चकमकीत पाच दहशतवाद्यांना भारतीय जवानांनी कंठस्नान घातले आहे. या गोळीबारात दोन जवानही जखमी झाले आहेत. पोलीस आणि सुरक्षा दल दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर देत आहेत. दहशतवाद्यांच्या उपस्थितीबाबत विशिष्ट गुप्तचर माहितीच्या आधारे भारतीय लष्कर आणि जम्मू–काश्मीर पोलिसांनी कादर, कुलगाम येथे संयुक्त ऑपरेशन सुरू केले.

# पुढच्या पाच वर्षात मागेल त्याला सौर कृषी पंप

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा, सध्या शेतकऱ्यांना मोफत वीज

**नागपूर । प्रतिनिधी**

**सध्याच्या घडीला राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज दिली जात आहे. ती पुढेही पाच वर्ष दिली जाईल. यात कोणताच बदल केला जाणार नाही, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनात केली. ते गुरूवारी (दि.१९) राज्यपालांच्या अभिभाषणावरील प्रस्तावाला उत्तर देताना बोलत होते. यावेळी त्यांनी, राज्यात २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट वीज कार्यान्वित करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचीही माहिती दिली.**



यावेळी फडणवीस म्हणाले, मागच्या काळात राज्यात सरकारने सौर ऊर्जेचं काम हाती घेतले. ते जोरात पुढे नेले जात आहे. शेतकऱ्यांना दिवसाही थ्री फेज वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिणी २ ही योजना सुरू केली आहे. या योजनेतंर्गत सोलर अ‍ॅग्रो पॉवर लिमिटेड अशा कंपनीची स्थापना केली गेली आहे. आतापर्यंत १६ हजार मॅगावॅट विजेचे प्रकल्प सरकारने सुरू केल्याची माहिती फडणवीस यांनी दिली आहे. फडणवीस यांनी योजनेतंर्गत ८ हजार ४२८ कृषी वाहिन्या वेगळ्या करण्यात आल्या असून त्या सौरउर्जेवर कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. आतापर्यंत ६६९ मेगावॅट वीजेची निर्मिती झाली आहे. तर १ लाख ३० हजार ४८६ शेतकऱ्यांना वीजेचे कनेक्शन देण्यात आल्याचे फडणवीस यांनी सांगितले. तसेच सरकारचा २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट वीज प्रकल्प कार्यान्वित करण्याचा मानस असून दिवसाही शेतकऱ्यांना मोफत वीज दिली जाईल. पान २ वर

### सौर कृषीपंपावरून दानवे यांचा आरोप

केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून सौर कृषी पंपासाठी योजना राबवली जात असून आत्तापर्यंत १२ लाख ४६ हजार ४२६ शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत. पण फक्त १ लाख २९ हजार ८४७ शेतकऱ्यांच्या शेतात सौर कृषीपंप बसवण्यात आल्याचा दावा विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. ते राज्यपालांच्या भाषणावर बोलत होते. यावेळी दानवे यांनी आगामी अर्थसंकल्पात या योजनेसाठी आर्थिक तरतूद वाढवली तरच शेतकऱ्यांना फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली होती.

## विधान परिषदेच्या सभापतीपदी राम शिंदेंची निवड

**नागपूर। प्रतिनिधी**

**विधानपरिषदेच्या सभापती पदासाठी गुरूवारी महायुतीतर्फे भाजपाचे प्रा. राम शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. निवडीनंतर राम शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला. भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी कवितेच्या माध्यमातून सभापती प्रा. राम शिंदे यांचे अभिनंदन केले.**



कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे रोहित पवार यांच्या विरोधात भाजपाकडून राम शिंदे यांना दोन वेळा उतरविण्यात आले. मात्र राम शिंदे यांचा दोन्हीवेळा पराभव झाला. त्यामुळे दोन टर्मपासून राम शिंदे हे विधान परिषदेचे सदस्य आहेत. राम शिंदे यांना विधान परिषदेच्या उपसभापती पदासाठी यापूर्वीच भाजपाकडून अंतिम करण्यात आले होते. मात्र उपसभापती अ‍ॅड नीलम गोऱ्हे यांना पूर्ण संधी मिळावी आणि त्यांच्या कार्यकाळात काही कार्यक्रम पूर्ण करता यावे यासाठी राम शिंदे यांची सभापती पदासाठी निवड करण्यात आली नव्हती. आपली कारकीर्द येणाऱ्या काळात चांगली व राज्याच्या प्रगतीची जावो, अशा शुभेच्छा देत महाराष्ट्राच्या हितासाठी सहकार्याची भूमिका घेऊ, असे आश्वासन विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास यांनी नवोनिर्वाचित सभापती प्रा. राम शिंदे यांना आपल्या स्वागतपर भाषणात दिले.

# बीड जिल्ह्यात मानवतेचे धिंडवडे...!

## आ.सुरेश धस यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सुत्रधाराची कुंडलीच मांडली

## सभागृहाला सविस्तर माहिती देत मुख्यमंत्र्यांकडे केली कठोर कारवाईची मागणी



**आष्टी । प्रतिनिधी**

**गेल्या काही वर्षात बीड जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था धाब्यावर बसवण्यात आली असून, गोरगरिबांच्या लेकराचा दिवसा ढवळ्या निर्घृणपणे खून करण्यात आला असून, त्यामुळे मानवतेचे धिंडवडे निघाले आहेत. बीड जिल्ह्यात काय करून ठेवले आहे ? असा सवाल करत भारतीय जनता पार्टीचे आमदार सुरेश धस यांनी सभागृहामध्ये महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्र्यांनी याबाबत अत्यंत कठोर कारवाई करून या खून प्रकरणातील सर्व आरोपी, त्यांचे पाठीराखे, त्यांचे मार्गदर्शक (आका ) शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यासाठी सीआयडी ऐवजी विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास यंत्रणा स्थापन करावी, अशी मागणी केली.**



मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनाची सविस्तर कहाणी कथन करताना पान २ वर

### शस्त्र परवाने दिलेल्यांची चौकशी करा

मुंबई पेक्षाही बीड जिल्ह्यामध्ये शस्त्रास्त्र परवाने ज्यादा असून बाराशे ते तेराशे शस्त्रास्त्र परवानाधारक आहेत ते कसे परवाना मिळवतात? याची मला माहिती आहे ते मी मुख्यमंत्र्यांना सांगणार आहे, परंतु हे दिखाऊ कार्यकर्ते शस्त्र परवानाधारक हे गोरगरिबांना धाक दाखवण्यासाठी या पिस्तुलांचा वापर करतात. धाब्यावर बसून ते फायरिंग करतात. लग्नकार्यात देखील ते शस्त्र अडकवून आपण फार मोठे आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न करतात. यांना कशासाठी शस्त्र पुरविण्यात आले आहे? याची चौकशी होईपर्यंत या सर्व पिस्तूल रिवॉल्वर परवानाधारकांची शस्त्रे बीड जिल्हाधिकाऱ्यांनी जमा करून घ्यावीत, अशी मागणी आ.धस यांनी केली.

### आ.धस यांचे सर्वत्र कौतूक

सत्ताधारी पक्षाचे आमदार असून देखील आमदार सुरेश धस यांनी सर्वसामान्य तरुण असलेला सरपंच याची निर्घृण हत्ये प्रकरणी अत्यंत आक्रमकपणे, कठोरपणे,अभ्यासपूर्ण आणि धाडसीपणे हा विषय सभागृहात मांडला याबद्दल बहुसंख्य आमदारांनी त्यांना पाठिंबा दर्शवला. नागपूर अधिवेशनामध्ये अनेक आमदारांनी त्यांचे कौतुक केले आहे.

### रासुका, मोक्का किंवा एमपीडीए कायद्यानुसार कठोर कारवाई करा

सर्व गुन्हेगारांसह त्यांच्या सूत्रधार यांच्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा, राष्ट्रीय सुरक्षा कायदा, तसेच झोपडपट्टी दादा कायदा, एमपीडीए या कायद्यान्वये सर्वांना स्थानबद्ध करण्यात यावे. त्यातून संपूर्ण महाराष्ट्र राज्याला संदेश मिळेल की, गोरगरीब तरुणांची हत्या केल्याचा परिणाम काय होतो ? याचे उदाहरण महाराष्ट्र राज्यामध्ये दिसून येईल. त्यामुळे या प्रकरणी अत्यंत कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी आ.सुरेश धस यांनी केली. पान २ वर

### आरोपिंचे कॉल डिटेल्स काढून त्यांच्या सूत्रधारावर कारवाई करा

संतोष देशमुख याचे मारेकरी असलेले विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतीक घुले आणि केदार या आरोपींचे गेल्या वर्षभरातील कॉल डिटेल्सची चौकशी करण्यात यावी गेल्या वर्षभरात ते कोणाला भेटले ? कोणा बरोबर फोटो काढले ? कुठे कुठे ते त्यांच्याबरोबर गेले होते ? या सर्व सूत्रधारांचा शोध घेण्यात यावा. या क्रूरकर्म्यांचे ''आका '' कोण आहेत ? याचा शोध घेऊन महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या गंभीर प्रकरणाची दखल घेतील याचा मला पूर्ण विश्वास असून, ही बीड जिल्ह्यातील दादागिरी आणि दहशतवाद मोडून काढण्याची क्षमता असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून संपूर्ण महाराष्ट्र राज्याला अपेक्षा आहेत.

## थंडीची तीव्रता कमी होणार; नागपूर वेधशाळेचा अंदाज

मुंबई : नैर्ऋत्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता वाढल्याने राज्यात बहुतेक ठिकाणी किमान तापमानाचा पारा १ ते २ अंशाने वाढला आहे. कमी दाबाचे हे क्षेत्र तामिळनाडूसह आंध्र प्रदेशाकडे सरकणार असून राज्यात पाच दिवस हवामान कोरडे रहाण्याची शक्यता आहे. किमान तापमान ३ ते ४ अंशाने वाढून पान २ वर

# हत्या प्रकरणावर आ.क्षीरसागरांनी पुन्हा सभागृहात आवाज उठवला

## मुख्य सुत्रधाराला अटक न केल्यास कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल

**नागपूर । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या निघृण हत्त्या प्रकरणावर आ.संदीप क्षीरसागर सातत्याने आवाज उठवत आहेत. गुरुवारी (दि.१९) रोजीही अधिवेशनाच्या चौथ्या दिवशीही आपात्कालीन चर्चा १०१ मध्ये या गंभीर प्रकरणावर सभागृहात आ.क्षीरसागर यांनी आक्रमकपणे सर्वांचे लक्ष वेधले.**



स्व.संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येचा मुद्दा महाराष्ट्रभर गाजत असून, या प्रकरणात न्याय कसा आणि केव्हा मिळेल याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर हे पहिल्या दिवसापासून आक्रमकपणे या प्रकरणात आवाज पान २ वर

# गोळीबार प्रकरणातील कुख्यात आरोपी गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पुणे येथे पाठलाग करून पकडले

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोळीबार करून फरार झालेल्या कुख्यात आरोपींना अखेर स्थानिक गुन्हे शाखेने पुण्यात पाठलाग करून पकडले आहे. काल रात्री उशिरा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय मुरकुटे, मुन्ना वाघ यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी ही मोठी कारवाई केली आहे. अक्षय आठवले, मनीष क्षीरसागर, ओंकार सवाई असे अटक केलेल्या आरोपीचे नावे आहेत. ओंकारला बीडमधून तर अक्षय आठवले आणि मनीष क्षीरसागरला पुण्यातून बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचा खून झाल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली असतानाच त्याच काळामध्ये बीड शहरातील गांधीनगर परिसरात पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१९ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.५० क्विंटल | २,४११ | २,९३० | २,६७० |
| ज्वारी/हायब्रिड: ५१.५० क्विंटल | १,९१० | ३,१७६ | २,३४९ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,६५० | ८,५०० | ८,०७५ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,९०१ | ७,५६० | ६,८२० |
| बाजरी: ९.५० क्विंटल | २,४०० | ४,३०१ | ३,१६६ |
| मुग : ७.०० क्विंटल | ६,२०० | ७,६०० | ६,९४० |
| सोयाबीन: ४०.५० क्विंटल | ४,००० | ४,०५० | ४,०१६ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,१५१ | ५,६०० | ५,३७५ |

## आरोपींना अटक झाली नाही तर समाज रस्त्यावर उतरेल–जरांगे पाटील

बीड । प्रतिनिधी

संतोष देशमुख यांचे अपहरण व खून प्रकरणाला ११ दिवस झाले. तरीही यातील प्रमुख आरोपी अद्यापही अटक नाहीत. या गुन्ह्यात सहभागी कोणीही असले तरी पोलिस प्रशासनाने त्यांना तत्काळ अटक करावी. अथवा समाज रस्त्यावर उतरेल आणि मग आवरणे कठीण जाईल, असा इशारा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पान २ वर



## खुनाचा प्रयत्न, गुन्हेगारी कृत्य : गंभीर कलमांखाली राहुल गांधींविरोधात तक्रार दाखल

नवी दिल्ली । वृतसंस्था

संसदेत धक्काबुक्कीवरून राजकारण तापले आहे. भाजपने राहुल गांधींवर आपल्या खासदारांना धक्काबुक्की केल्याचा आरोप केला आहे, ज्यात दोन खासदार जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. महिला खासदारानेही राहुल गांधींवर आरोप केले आहेत. या धक्काबुक्कीच्या घटनेबाबत भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी संसद मार्ग पोलिस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या आहेत. पान २ वर

# गृहमंत्री शहांच्या वक्तव्याचे तीव्र पडसाद

## संसद, विधानसभा परिसरात विरोधक आक्रमक

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**गृहमंत्री अमित शाह यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर केलेल्या वक्तव्यावरून देशभरात तीव्र पडसाद उमटत आहेत. राज्य विधिमंडळाचे आणि संसदेचे हिवाळी अधिवेशन सध्या सुरू आहे. अधिवेशनादरम्यान गुरूवारी (दि.१९) अमित शाहा यांच्या वक्तव्यावरून विरोधी पक्षांची संसदेतील इंडिया आघाडी आणि विधानसभेतील मविआ आक्रमक झाली आहे.**

### नागपुरातही मविआ आमदाराकडून शहा यांचा निषेध

गृहमंत्री अमित शहा यांच्या संसद सभागृहातील वक्तव्याचे पडसाद राज्याच्या हिवाळी अधिवेशनात देखील दिसून येत आहेत. यावरून महाविकास आघाडीच्या आमदारांनी नागपूरात संविधान चौक ते विधानभवनापर्यंत निषेध रॅली काढली. यावेळी महाविकास आघाडीच्या आमदारांनी या वक्तव्याच्या निषेधार्थ निळ्या रंगाच्या गांधी टोपी आणि गळ्यात निळ्या रंगाचे स्कार्फ परिधान करत गृहमंत्री अमित शाहा यांच्या वक्तव्याचा निषेध केला. यावेळी मविआचे आमदार उपस्थित होते.



गृहमंत्री अमित शाह यांच्या डॉ. आंबेडकरांवरील वक्तव्यावरून संसद परिसरात इंडिया आघाडीतील खासदारांनी आंदोलन केले आहे. दरम्यान सर्व पान २ वर

अग्रलेख

# सदिच्छा भेटीत दडलंय काय ?


गारठून टाकणाऱ्या थंडीत नागपुरात मंगळवारी उद्धव ठाकरे व त्यांच्या २० आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आणि सभापती राहुल नार्वेकर यांची घेतलेली भेट ही सदिच्छा भेट म्हणून सांगितली जाते आहे. १२ तारखेला दिल्लीत अजित पवार यांनी शरद पवार यांचे दर्शन घेऊन त्यांना दिलेल्या शुभेच्छा यासुद्धा सदिच्छा मानल्या जात आहेत पण 'एक तर तू राहशील किंवा मी' अशी टोकाची कडवी भाषा आणि फडणवीसांच्या शपथविधीवर बहिष्कार टाकणारी मंडळी अचानक बदलतात तेव्हा काही ना काही गडबड असतेच असते. आग असली तरच धूर येतो, अगदी तसाच प्रकार या सदिच्छा भेटीत दिसून आला आहे.

उद्धव ठाकरे हे सहजासहजी भूमिका बदलणारे नरम होणारे नेते नाहीत. देवेंद्र फडणवीस यांना जेथे जमेल तेथे कडव्या शब्दात लक्ष बनवणारे आणि त्यांचा फोनही न स्विकारणारे, शपथविधीवर बहिष्कार टाकणारे ठाकरे अचानक मुख्यमंत्री दालनात येऊन फडणवीस यांना शुभेच्छा देतात यामागे काय कारण असावे असा सर्वांना संभ्रम पडलेला आहे. बरं ही भेट होताच त्यांनी सावरकर यांच्या मुद्यावरून काँग्रेसला फटकारत मोदींनी सावरकरांना भारतरत्न जाहीर करावा अशी मागणीही केली आहे. उद्धव ठाकरे यांची ही चाल मूळपदावर येण्यासाठी आहे की विरोधी पक्ष नेतेपद पदरात पाडून घेण्यासाठी आहे की ईडी वगैरे भीतीने आहे की राजकारणातील भाजपची ही चाल आहे, हे लगेच आताच स्पष्ट होणार नाही पण 'कुछ तो गडबड है'. महाराष्ट्रात महायुतीला प्रचंड बहुमत आहे. केंद्रात नरेंद्र मोदी सरकारला दोन टेकू आहेत. या पार्श्वभूमीवर झालेल्या भेटी केवळ शुभेच्छा, सदिच्छा म्हणता येणार नाही. शिवसेनेकडे २० आमदार आहेत 'तूम्ही फडणवीस तर आम्ही २०' हा डायलॉग ठाकरेंनी मारला आहे. भाजपकडे स्वत: व सहयोगी १४३ आमदारबळ आहेत तर शिवसेनेकडे २० आमदार आणि ९ खासदार आहेत तीच गोष्ट राष्ट्रवादीची. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे १० आमदार आणि ८ खासदार आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गट अजितदादा गटात विलीन व्हावा आणि ठाकरे शिवसेना गट एनडीएमध्ये सहभागी व्हावा यासाठी धोरणात्मक प्रयत्न दिसत आहेत. तसे झाले तर काँगेस एकाकी पडेल आणि केंद्रात व राज्यात भाजप सरकार अधिक सशक्त होईल, देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रीमंडळ पूर्ण केले आहे पण एक मंत्रीपदाची जागा रिक्त ठेवली जाते तो सापळा आहे. फडणवीस यांनी सांगली जिह्यातील एकालाही मंत्रीपद दिलेले नाही. ओघानेच हा सापळा सांगलीत कुणासाठी तरी लावला असावा का? असा कयास बांधला जातो आहे पण पाण्यात बसलेली म्हैस उठत नाही तोवर खात्री देता येत नाही. पण फडणवीस व अजितदादा यांची भूमिका दडून राहिलेली नाही. उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातील संवाद, सख्ख्य यामुळे एकनाथ शिंदे गट अस्वस्थ होऊ शकतो पण आता त्यामुळे महायुतीतील एकनाथ शिंदे वगैरेची अडवणूक भूमिका निवळेल हे वेगळे सांगायला नको. जोडीला भाजपला केंद्रात जे निर्णय घ्यायचे आहेत ते घेता येतील. महाराष्ट्रात मंत्रीमंडळ विस्तार आणि खातेवाटप झाल्यावर सुरु झालेला तमाशा, छगन भुजबळ, सुधीर मुनगंटीवार वगैरे मंडळींची नाराजी यामुळे महायुतीला उत्तम बहुमत आणि अनेकांना मंत्रीपदाची संधी मिळूनही नाराजीचे सत्र सुरुच आहे. नाराज मंडळी शड्डू ठोकताना दिसत आहेत. महाराष्ट्रात ओबीसीमध्ये ज्या जात दांडग्या जाती आहेत त्यामध्ये माळी जात आहे. आपण माळी आणि ओबीसीचे लढाऊ नेते आहोत अशी भुजबळ यांची भूमिका आहे. ते बाळासाहेब ठाकरेंच्या मुशीतून तयार झालेले नेते आहेत. भाजपने दोन मंत्रीपदे माळी समाजाला दिली पण अजितदादांनी एकही पद न देता छगन भुजबळ यांना डावलले. त्यातूनच 'कसला दादा कसला वादा' म्हणत आणि जहाँ नही चैना असे ट्विट करत भुजबळ यांनी नाराजीची तलवार उपसली आहे. वहाँ नही रेहना असे संकेत दिले आहेत. भुजबळ पंधरा आमदारांसह पक्ष सोडणार अशीही कुजबुज सुरु झाली आहे. ओघाने भाजप संधीवर आणि भक्कम बळावर लक्ष ठेवून आहे. इंडी आघाडीत नेतृत्व कुणाकडे यावरुन वाद आहे. विरोधी नेते पद आणि इंडी नेतृत्व एकाच व्यक्तीकडे नको. इंडी नेतृत्व ममता बॅनर्जी यांचेकडे द्या अशी मागणी होते आहे, काँग्रेसमध्ये 'ना केंद्रात, ना राज्यात' दोन्हीकडे सत्ता नाही. यामुळे तळमळ आहे. महाराष्ट्रातही महाआघाडीत कुरबुरी सुरु आहेत, हे सगळे लक्षात घेऊन ठाकरे व पवार यांची पावले पडताना दिसत आहेत. देवेंद्र फडणवीस यांनीही राजकीय संवाद, सहकार्य आणि चांगले वातावरण यासाठी पहिल्याच भाषणात अवाहन केले होते व हात पुढे केला होता. त्याला ठाकरेंनी टाळी दिली असेही या सदिच्छा भेटीबद्दल म्हणता येईल पण या निमित्ताने ठप्प संवाद आणि एकमेकांना संपवणे भाषा संपली असे म्हणता येईल.

ठाकरे एकदा पंगा घेतला की काहीही होवो तो कायम राखतात, असा इतिहास आहे. या प्रकरणात काय होते ते बघावे लागेल. विधानसभा विरोधीपक्ष नेते पद कोणत्याही विरोधी पक्षाची संख्या २८ पेक्षा जास्त नाही. म्हणून कुणालाच मिळू शकत नाही. विधीमंडळात विरोधी पक्ष दुबळा झाला आहे असा दुबळा विरोध हा सदृढ लोकशाहीला मारक होतो व विरोधी भूमिका जनताच निभावते. त्यातून सतत अशांतता माजते, असे शास्त्र सांगते. म्हणून शिवसेनेला सदस्य संख्या नसली तरी विरोधी नेतेपद देण्याचे घाटत आहे. आदित्य ठाकरे किंवा अन्य विरोधी नेते होऊ शकतात. एकुणच देवेंद्र फडणवीस आस्ते चाल भविष्याचा वेध घेत पावले उचलत आहेत. राज्य सरकार दणकट आहेच. जोडीला केंद्र सरकार दणकट करण्यासाठी महाराष्ट्रातून हालचाली सुरु आहेत. पवार मंडळी कायम सत्तेचेच राजकारण करतात. शरद पवार पाच वर्षे सत्ता वंचित राहतील, यावर कुणाचा विश्वास नाही. त्यामुळे दादा-साहेब भेट आणि देवाभाऊ-उद्धवसाहेब भेट केवळ शुभेच्छा, सदिच्छा भेट नाही या दोन्ही भेटीत मोठे राजकारण दडलेले आहे, अनेक शक्यता दडलेल्या आहेत आणि अनेकांना यातून योग्य समजही प्राप्त झाली आहे. शेवटी राजकारणात सत्ता महत्त्वाची आणि सत्तेसाठी राजकारणात कोण कुणाचा कायमचा मित्र नसतो, कायमचा शत्रू नसतो हेही खरे.

## चोराच्याच हातात चावी देताय?

सोशल मीडिया हे तंत्रज्ञान आहे आणि कोणत्याही तंत्राच्या जशा जमेच्या बाजू असतात तशा उणिवाच्या बाजू यातही आहेत. आपण त्या जाणून घेतल्याशिवाय त्याचा वापर करणं आपल्यालाच अडचणीत आणू शकतो याची जाणीव सर्वांना असायला हवी.. वाहनाला ब्रेक असतात ते सुरक्षेच्या कारणासाठी आणि त्याचाच वापर करून आपण गतिमान प्रवास करू शकतो त्याच प्रकारे त्याच्या सर्व बाजू आपण तपासायला पाहिजेत.



सायबर गुन्हेगारीत वाढ होण्यासोबत इतर प्रकारचे गुन्हे वाढण्याचं कारण देखील इंटरनेट बाबत पूर्ण ज्ञान नसणं हे आहे या माध्यमातून आपण कळत नकळत गुन्हेगारीला आमंत्रण तर देत नाही ना याबाबत सर्वांनीच विचार करावा. माहितीचा महापूर आणण्यासोबत या माध्यमाने आपल्याला वाचक वर्ग निर्माण करता येतो म्हणून अनेक जण लिहिते झाले परंतु त्या माध्यमाचा गैरवापर करणारे देखील यात सामील झाले आहेत याची जाणीव ठेवूनच सर्वांनी कृती करावी. सध्याची रिल्सची क्रेझ आहे ती चोरांना चक्क आमंत्रण ठरतेय ''सहकुटुंब गोवा सहलीवर'' असं म्हणत टाकलेली रील असो की 'सहकुटुंब तीर्थयात्रेवर' अशी रील या रिअलटाईम शेअरिंगने चोरांना कळतं आपलं घर मोकळं आहे. तीर्थयात्रा आपण करतो पण चोर मात्र प्रसाद तुमच्या घरातून चोरी करून मिळवतात अशा घटना हल्ली वाढल्या आहेत. आपण उत्साहाच्या भरात व्हिडिओ माहिती शेअर करण्याबाबत अतिशय गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. सहल संपल्यानंतर सहलीचे फोटो आपल्याला माध्यमावर टाकता येतात. ज्याला म्हणतो असा वेळ कुटुंबासोबत घालवावा यात कुटुंबाला मिळणारा आनंद महत्त्वाचा आहे. हल्ली चौकोनी किंवा त्रिकोणी कुटुंब आहेत आणि बहुतेक घरात सध्याच्या धक्काधक्कीच्या आणि व्यस्त जीवनशैलीमुळे एकमेकांना वेळ देणे शक्य होत नाही या पार्श्वभूमीवर आपण या बाबीचा विचार करण्याची गरज आहे. यातून आपण वाढलेल्या गुन्हेगारीला ज्यात चोरी-घरफोडी अशांचा समावेश अशांचे कारण देखील 'सायबरवेड' हेच आहे. अनेक बाबतीत घडणारा आणखी एक गुन्हयाचा प्रकार म्हणजे 'तुमचीच चोरी' वाचायला जरा वेगळं वाटलं तरी हे सत्य आहे आपल्या प्रोफाइलची हुबेहुब प्रतिकृती करून प्रोफाइल नव्याने सादर होते आणि आपण अडचणीत आहोत पैशाची गरज आहे असे संदेश मित्र व नातेवाईकांना जातात यातून अनेक प्रकारे लुटले जाते एका वरिष्ठ आय.ए.एस अधिकाऱ्याबाबत हा प्रकार ३ वेळा घडल्याचे मी स्वतः बघितले आहे. सायबर सुरक्षित गोपनीयता आणि शेअरिंग बाबतची काळजी यासाठीच महत्त्वाची असते. 'बडे धोके है इस रहामें ' हे कायम लक्षात ठेवा तुम्ही सुरक्षा बाळगली नाही तर त्याचा तोटा तुम्हालाच होणार आहे याची जाणीव ठेवून काम करा व शक्यतो व्हिडिओ टाळा.

(प्रशांत विजया अनंत दैठणकर)

## फेर दुरुस्तीसाठी आदेश काढण्याकरता लाच घेताना तलाठी पकडला

जालना | प्रतिनिधी

**तक्रारदार यांचे फेर दुरुस्ती करण्यासाठी आदेश काढुन देण्यासाठी तहसीलदार, व पेशकार शिंदे यांचेकरीता २०,००० रुपये लाचेची मागणी करुन २०,००० रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना मौजे इंदेवाडी (ता. जालना) सजाचे तलाठी शिवदास प्रेमसिंग पवार यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने रंगेहाथ पकडले. शिवदास प्रेमसिंग पवार, वय ४६ वर्ष पद तलाठी मौजे इंदेवाडी सजा, ता. जि. जालना, तहसील कार्यालय, जालना रा. सोरटीनगर अंबड चौफुलीजवळ जालना याबाबत सविस्तर माहिती अशी की दि. १९.१२.२०२४ रोजी तलाठी यांचे खासगी कार्यालय, सोरटीनगर अंबड चौफुली या ठिकाणी आहे.**

येथे २०,००० रुपये. लाच घेताना पकडण्यात आली. तकारदार यांनी इसार पावतीव्दारे घेतलेल्या जमीनीची त्यांना खरेदी करणे असल्याने खरेदीसाठी फेर दुरुस्ती करणे आवश्यक आहे, त्याकरीता तकारदार तलाठी शिवदास पवार यांना भेटले असता त्यांनी फेर दुरुस्ती करणेसाठी तहसीलदार यांचा कलम १५५ महाराष्व जमीन महसुल अधिनियम १९६६ नुसार आदेश काढावा लागेल, त्यासाठी तहसीलदार मॅडम आणि पेशकार शिंदे यांना २०,००० रुपये दयावे लागतील, असे म्हणुन तकारदार यांचेकडे २०,००० रुपये लाचेची मागणी केली, परंतु तकारदार यांची त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, यांचेकडे तक्रार केली. सदर तक्रारीवरुन दिनांक १८.१२.२०२४ रोजी तकारदार व तलाठी यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता वीस हजार रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पण्ण झाले. त्यावरुन आज दि. १९.१२.२०२४ रोजी सापळा लावला असता पथकाने तलाठी यांना लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे. उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु होती. सदरील कारवाई श्री. बी.एस. जाधवर, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, जालना यांनी व पथकातील अंमलदार गजानन घायवट, शिवाजी जमधडे ,गणेश नेके, गणेश बुजाडे, कृष्णा देठे यांनी केली आहे.

## सोलार पॅनलचा सर्वे करण्यासाठी लाच घेताना शेख व लोखंडे यांना पकडलं

जालना | प्रतिनिधी

**तकारदार यांचे सोलार पॅनल मिळण्यासाठीचा सर्व्हे करुन देण्यासाठी १,००० रुपये लाचेची मागणी करुन १,००० रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना इकोझन सोलार कंपनीचा फिटर आणि महावितरणचा कंत्राटी कर्मचारी यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, पथकाने रंगेहाथ पकडले.**



आरोपी यांचे नाव समाधान धोंडीबा लोखंडे, वय ३० वर्ष पद फिटर, इकोझन सोलार कंपनी रा. आंबेगाव, ता. जाफराबाद जि. जालना तसेच कौसर नसीर शेख, वय ३० वर्ष (कंत्राटी) बाहयखोत कंत्राटी महावितरण, रा. दहेगाव, दि. ०९.११.२०२४ रोजी शेत गट के ७५, जाफराबाद तालुक्यातील मौजे गाढेगव्हाण शिवारात घटना तकारदार यांनी त्यांचे शेत जमीनीवर सोलार पॅनल बसवण्यासाठी ऑनलाईन अर्ज केला होता, त्यावरून सोलार पॅनल बसविण्यासाठीचे जागेचा सर्व्हे करण्याचे काम आरोपी समाधान लोखंडे यांचेकडे आहे, त्यावरुन तकारदार हे जागेचा सर्व्हे करुन मिळण्यासाठी आरोपी समाधान लोखंडे यांना भेटले असता, त्यांनी सर्व्हे करुन देण्यासाठी १,००० रुपये दयावे लागतील, असे म्हणून तक्रारदार यांचेकडे १,००० रुपये लायेची मागणी केली, परंतु तकारदार यांची त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, यांचेकडे तकार केली. सदर तक्रारीवरुन दिनांक ०९.११.२०२४ रोजी तकारदार व आरोपी यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता आरोपी तक्रारदार यांचे सोलार पॅनल बसविण्याचे जागेचा सर्व्हे करुन देण्यासाठी पंचासमक्ष १,००० रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम आरोपी कं २ कौसर नसीर शेख यांचेकडे देण्याचे सांगीतल्याचे निष्मण्ण झाले. त्यावरून सापळा लावला असता तक्रारदार यांचे सोलार पॅनल बसविण्याचे जागेचा सर्व्हे करून देण्यासाठी आरोपी के १ समाधान लोखंडे यांनी तक्रारदार यांचेकडे १,००० रुपयांचे लाचेची मागणी केलेली रक्कम तकारदार यांचेकडुन आरोपी कं २ कौसर नसीर शेख याने पंचासमक्ष १,००० रुपये लाचेची रक्कम स्विकारली असताना पथकाने रंगेहाथ पकडले आहे. आरोपी यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे टेंभुर्णी, जि. जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. सदरची कामगीरी व कारवाई श्री. बी. एस. जाधवर, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्पान ब्युरो, जालना व पथकातील अंमलदार गजानन घायवट, शिवाजी जामधडे ,गणेश बेके, भालचंद्र बिनोरकर यांनी केली आहे.

## पान १ वरून...

### पुढच्या पाच वर्षात मागेल

सध्या शेतकऱ्यांना विज मोफत दिली जात असून याचा १५ हजार कोटींचा भार तिजोरीवर पडत असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. याआधी शेतकऱ्यांना देण्यात येणारी वीज ८ रूपये पडायची आणि सरकार त्यांच्याकडून सव्वा किंवा दिड रूपये घेत होते. मात्र आता ही वीज तीन रूपये पडणार आहे. यामुळे सरकारच्या साडेचार रुपयांची बचत होणार आहे. याचा सारासार विचार केल्यास १० हजार कोटींची बचत फक्त वीज खरेदीत होणार होईल. तसेच क्रॉस सबसिडीतही ५ हजार कोटींची बचत होईल, असा दावा फडणवीस यांनी केला आहे. यासोबतच फडणवीस यांनी, मोफत वीज योजनाही सुरूच असून पुढच्या पाच वर्षात शेतकऱ्यांकडून पैसे घेतले जाणार नाहीत. यात कोणताही बदल केला जाणार नाही, अशी ग्वाही दिली आहे. सौर कृषी पंप योजनेतून ९ लाख कृषी पंप उपलब्ध झाले असून पुढच्या काळात मागेल त्याला कृषी पंप तीन महिन्यात दिले जातील. तर २ लाख ३६ हजार १८६ कृषी पंपांची जोडणी करण्यात आल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

---------

### बीड जिल्ह्यात मानवतेच

आ.धस स्वतःसह संपूर्ण सभागृह भावना विवश झाले असल्याचे दिसून आले. केज तालुक्यातील मस्साजोग येथील अत्यंत गरीब घरातील लोकनियुक्त तरुण सरपंचाची क्षुल्लक कारणावरून निर्दयपणे हत्या केली आहे. यापुढे अशा प्रकारच्या गोरगरीब लेकरांचे खून होऊ नयेत म्हणून या प्रकरणातील प्रत्यक्ष गुन्हेगार आणि त्यांच्या सूत्रधारावर कायम जरब बसेल अशी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे, असे आ.धस म्हणाले. संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील घटनाक्रम सांगताना अत्यंत आक्रमक आणि धाडसी वृत्ती बद्दल प्रसिद्ध असणारे आमदार सुरेश धस हे देखील हेलावून गेल्याचे यावेळी पहायला मिळाले. त्याचबरोबर संपूर्ण सभागृहातील सदस्य देखील हा वृत्तांत ऐकून गलबलून गेल्याचे दिसून येत होते. पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, मस्साजोग येथील तरुण सरपंच हा भारतीय जनता पार्टीचा बूथ प्रमुख म्हणून काम करत होता. केजच्या आमदार नमिता मुंदडा यांच्यासाठी त्याने काम केले आहे अत्यंत गरीब घरातील हा तरुण तिसऱ्यांदा सरपंच झाला आहे. तीन वेळा आमदार होणे सोपे आहे परंतु तीन वेळा सरपंच होणे सोपे नाही. अवादा या पवन ऊर्जा प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना गेल्या दोन महिन्यापूर्वी बीड जिल्ह्यातील एका तालुक्यामध्ये बोलवून घेऊन त्यांना दोन कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यातील काही रक्कम देण्यात आली होती आणि उर्वरित रकमेसाठी त्यांच्याकडे सतत मागणी होत होती. या अवादा कंपनीच्या कार्यालयाकडे मस्साजोग येथील काही तरुण सुरक्षारक्षकाचे काम करतात. शुक्रवार दि.९ डिसेंबर रोजी केज तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष विष्णू चाटे यांनी सुदर्शन घुले, प्रतीक घुले आणि इतर काही जणांना कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे पाठवले. त्यावेळी गेटवर असलेल्या सुरक्षारक्षकाने अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन जावे असे सांगताच त्याला मारहाण करण्यात आली. हा तरुण दलित घटकातील असताना त्याला जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली आणि मारहाण करण्यात आली. हे समजताच सरपंच संतोष देशमुख हे त्या ठिकाणी गेले आणि प्रकरण मिटवण्यासाठी प्रयत्न करत असता त्यांनाही मारहाण झाली, त्यानंतर पोलिसांचे काही कर्मचारी आले आणि या तरुणांना घेऊन गेले. दलित तरुणाला मारहाण झाल्याबद्दल, जातिवाचक शिवीगाळ केल्याबद्दल अॅट्रॉसिटी कायद्यानुसार फिर्याद देण्यासाठी हा सुरक्षा रक्षक गेला होता. त्याचबरोबर अवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी देखील कार्यालयासमोर सुरक्षारक्षकाला मारहाण झाली याबाबत कंपनीतर्फे देखील फिर्याद देण्यात आली परंतु त्या दिवशीचे ठाणे अंमलदार चार तास पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित नव्हते. या दोन्ही फिर्यादी पोलिसांनी नोंदवून घेतल्या नाहीत कारण त्यावेळी पोलीस स्टेशन येथे विष्णू चाटे स्वतः येऊन पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क साधत होता. त्यावेळी या पोलीस अधिकाऱ्यांना कोणाकोणाचे फोन आले? याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी करत दलित तरुणाला आणि संतोष देशमुख यांना मारहाण करणाऱ्या सुदर्शन घुले, प्रतीक घुले, केदार आणि इतर दोन-तीन आरोपींवर थातूरमातूर अदखलपात्र गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ सोडण्यात आले. त्यानंतर शनिवार आणि रविवारी केजचे पोलीस उपनिरीक्षक भोसले हे सुदर्शन घुले यांना मोटारसायकलवर घेऊन फिरत होते. त्यावेळी एका हॉटेलमध्ये संतोषच्या भावाची भेट झाली त्यांनी प्रकरण मिटवण्यासाठी संतोषला ठाण्यात पाठवून द्या असे सांगितले. संतोष देशमुख त्यांच्या आते भावासह दि.९ डिसेंबर रोजी केज पोलीस स्टेशन येथे गेले परंतु त्या ठिकाणी गेल्यानंतर प्रकरण मिटवायचे नाही असे समजल्यानंतर ते परत आले. त्यानंतर भर राज्य रस्त्यावर टोल नाक्यावर त्यांचे अपहरण त्यांना अज्ञात ठिकाणी नेण्यात आले. त्यांचे आते भावाने परत पोलीस स्टेशनमध्ये येऊन या घटनेची माहिती दिली आणि विष्णू चाटे यांना फोन करून माझ्या भावाला मारू नका अशी विनंती केली. विष्णू चाटे यांना ३५ वेळा फोन केला त्यावेळी ते २० मिनिटात संतोष याला आणून सोडतो असे म्हणायचे परंतु चार तासाने त्याचा मृतदेह आढळून आला. त्याचे डोळे लाईटरने जाळण्यात आले होते, त्याच्या शरीरावर एक मिलिमीटर देखील जागा शिल्लक नव्हती, इतक्या अमानुषपणे त्याला शरिरावर मारहाण करण्यात आली. त्याने पाणी मागितले असता त्याला पाणी देखील देण्यात आले नाही. अंगावर दीडशे ते दोनशे घाव घालण्यात आले असून त्याचे अडीच तीन लिटर रक्त गोठल्याचे दिसून येत होते अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिल्याची माहिती सांगत आमदार धस पुढे म्हणाले की, किरकोळ मारहाण झाल्यानंतर वास्तविक पाहता या आरोपींवर अदखलपात्र गुन्हा असला तरी प्रतिबंधक कारवाई करण्यासाठी तालुका दंडाधिकारी अथवा स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे कडे पाठवले असते तर या आरोपींना थोडाफार धाक राहिला असता आणि ते घाबरले असते आणि हा पुढील अनर्थ टळला असता. परंतु पोलिस कोणाच्या दबावाखाली होते ? याची सखोल चौकशी करण्यात यावी असे मागणी करून आमदार सुरेश धस पुढे म्हणाले की, बीड जिल्हा हा परभणी जिल्ह्याच्या शेजारी असून या ठिकाणी वाहणाऱ्या मोठ्या नद्यांमुळे मोठ्या प्रमाणात वाळू उपलब्ध असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा लिलाव न होता कोणतीही रॉयल्टी ची पावती न फाडता दिवसा ढवळ्या शासकीय मालमत्तेवर दरोडा घालून प्रत्येकी १० टन वाळू वाहतूक करण्याच्या क्षमतेचे ३०० हायवा दिवसाढवळ्या रस्त्यावरून धावत असतात. या वाहनांद्वारे कोट्यावधी रुपयांची दिवसभरात कमाई केल्याशिवाय ही गुन्हेगार मंडळी झोपत नाहीत या सर्व गुन्हेगारांचा सूत्रधार कोण आहे ? कोणाच्या आशीर्वादाने दिवसाढवळ्या शासकीय मालमत्तेवर दरोडा घातला जातोय? याची चौकशी करण्यात यावी, असे ते म्हणाले.

------------------

### गोळीबार प्रकरणातील

काही गुंडांकडून घरात घुसून गोळीबार केल्याची घटना घडली होती. या घटनेने शहरासह जिल्हा हादरला होता. संतोष देशमुख यांच्या खुनानंतर राजकीय आरोप प्रत्यारोप होत असतानाच बीडमध्ये झालेल्या या गोळीबार घटनेमध्येही राजकारण आणण्याचा प्रयत्न केला गेला. ज्या मुख्य आरोपीने गोळीबार केला त्याचा बंधू अक्षय आठवले एका आमदारांचा निकटवर्तीय असल्यामुळे त्याला अभय मिळत असल्याच्या चर्चा करून यात आमदारांनाही ओढण्याचा प्रयत्न झाला. ज्यावर आरोप करण्यात येत होते अशा सनी आठवलेचे फोटो सगळ्याच नेत्यांबरोबर असल्याने दोन्ही बाजू कडून असे फोटो व्हायरल करण्यात आले. यामुळे राजकीय वातावरण सुद्धा ढवळून निघाले. संतोष देशमुख यांच्या हत्येमधील आरोपींचे अटक सत्र सुरू असतानाच बीड येथील गोळीबार प्रकरणातील आरोपींना अटक कधी करणार अशा चर्चा होत होत्या. अखेर पोलिसांना यश आले असून, बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने लागोपाठ दुसरी मोठी कामगिरी केली आहे. दरम्यान या गोळीबार प्रकरणात एकजण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर संभाजीनगर येथे उपचार सुरू आहेत. या गोळीबार प्रकरणात असलेल्या मनीष क्षीरसागर आणि अक्षय आठवलेवर अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील गांधीनगर मध्ये घडलेल्या गोळीबारा दरम्यान आरोपींनी अक्षरशः गोळ्यांचा पाऊसच पाडला होता.

-----------

### हत्या प्रकरणावर आ.क्षीरसागरांनी

उठवत आहेत आणि पाठपुरावा करत आहेत. यात नागपूर येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या ४ थ्या दिवशीही आ.क्षीरसागरांनी या प्रकरणावर सर्वांचे लक्ष वेधले. आरोपींचे कॉल रेकॉर्ड तपासण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केलेलघ आहे. ही मागणी पुन्हा एकदा सभागृहात आ.क्षीरसागर यांनी मांडली. वाल्मीक कराड हा जिल्ह्यातील सत्ताधाऱ्याच्या राजाश्रयाला असल्याने प्रशासनाकडून कारवाई केली जात नाही. परंतु लोकांच्या मनात एवढा रोष आहे, की अधिवेशन संपण्याअगोदर या गुन्ह्याच्या मुख्य सुत्रधारासह सर्व आरोपींना जर अटक झाली नाही तर कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखणे अवघड होईल. असा इशारा यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी दिला. त्यामुळे या गंभीर प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करून दोषींना कठोर शासन करण्यात यावे. यासोबतच स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने मदत करावी अशी मागणीही आ.क्षीरसागर यांनी केली.

**कशामुळे वाढली गुन्हेगारी?**

बीड जिल्ह्यात उद्योग नाहीत. लोकांना रोजगार नाही. त्यामुळे गुन्हेगारी क्षेत्राकडे तरूण वर्ग आकर्षित होतो. परिणामी जिल्ह्याभरात अवैध धंदे आणि त्यातून गुन्हेगारी वाढत आहे. त्यामुळे सरकारने जिल्ह्यात औद्योगिकीकरण आणि रोजगारासाठी ठोस पावले उचलावीत अशी महत्वाची मागणीही आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

**परभणी येथील आंबेडकरी कार्यकर्त्याच्या मृत्यूची सखोल चौकशी करा**

परभणी येथे संविधान प्रतिकृतीची विटंबना प्रकरणातून सर्वजातीय जनतेने आंदोलने केली होती. त्यातच सोमनाथ सुर्यवंशी या आंबेडकरी विचाराच्या युवक कार्यकर्त्याला पोलीसांनी अटक केली होती. सुर्यवंशी यांचा, पोलीसांच्या ताब्यात असताना मृत्यू झाला आहे. उत्तरीय तपासणीतून त्यांचा मृत्यू मारहाणीमुळे झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या अन्यायकारक प्रकरणातही सखोल चौकशी करून न्याय द्यावा अशी मागणीही यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

---------------

### थंडीची तीव्रता कमी होणार;

थंडीची तीव्रता कमी होण्याचा अंदाज नागपूर वेधशाळेने वर्तवला आहे. तसेच कोकणात काही ठिकाणी ढगाळ वातावरण राहणार असून, मध्य महाराष्ट्रात धुके पडण्याचा अंदाज आहे.

-----------

### आरोपींना अटक झाली नाही तर

पाटील यांनी दिला. पोलिस प्रशासनावर अटकेसाठी कोणाचा दबाव आहे का, असा सवालही पाटील यांनी विचारला. बीड मधील तळेगाव येथे गुरुवारी (दि.१९) हरिनाम सप्ताहातील काल्याच्या किर्तनासाठी आलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला. जरांगे पाटील म्हणाले, या घटनेमुळे सरकारवरील विश्वास ढळला आहे. मराठ्यांना गंभीर्यांना घेत१ले नाही तर काय होते ते यांना माहीत असल्याचेही ते म्हणाले. संतोष देशमुख समाजाचा भाऊ होता. त्याला न्याय मिळाला पाहिजे अन्यथाा रस्त्यावर उतरु, असेही जरांगे पाटील म्हणाले.

-----------

### खुनाचा प्रयत्न, गुन्हेगारी कृत्य : गंभीर

भाजपने आपल्या तक्रारीत राहुल गांधींवर खुनाचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे. भाजपने संसद मार्ग पोलिस ठाण्यात राहुल गांधींविरोधात तक्रार दाखल केली आहे. यानंतर भाजप खासदार अनुराग ठाकूर म्हणाले की, राहुल गांधी यांना कायद्याचे उल्लंघन करण्याची सवय आहे. त्यांच्या हाणामारीत दोन खासदार पडले आणि जखमी झाले. याबाबतची तक्रार खुनाच्या प्रयत्नाच्या कलमांतर्गत दाखल करण्यात आली आहे. बीएनएस कलम १०९ अन्वये तक्रार देण्यात आली आहे. या घटनेनंतर राहुल गांधी जखमी खासदारांना न भेटताच निघून गेले. ते स्वतःला कायद्यापेक्षा वरचे समजतात,' असा टोला लगावला. दरम्यान, काँग्रेसनेही भाजपविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

**राहुल गांधींविरुद्ध लावली ही कलमे**

कलम १०९ - हत्येचा प्रयत्न, कलम ११५ - दुखापत करणे, कलम ११७ - गंभीर दुखापत करणे, कलम १२१ - सरकारी कर्मचाऱ्याचे त्याच्या कर्तव्यापासून लक्ष विचलित करण्यासाठी दुखापत करणे, कलम ३५१ - गुन्हेगारी धमकी, कलम १२५ - इतरांची सुरक्षा धोक्यात आणणे

-------------

### गृहमंत्री शाहांच्या वक्तव्याचे

खासदारांनी निळ्या रंगाचा पोशाख परिधान करून मैं भी अंम्बेडकर, चे फलक हातात घेऊन जोरदार निदर्शने केली. दरम्यान संसदेच्या संकुलातील बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ इंडिया आघाडीने निषेध व्यक्त केला. यावेळी बाबासाहेब आंबेडकरांवरील वक्तव्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी माफी मागावी आणि राजीनामा द्यावा अशी मागणी देखील विरोधी पक्षातील खासदारांकडून करण्यात आली आहे. यावेळी संसदेचे विरोधी पक्षनेते काँग्रेस खासदार राहुल गांधी, प्रियंका गांधी, खासदार संजय राऊत यांच्यासह अन्य इंडिया आघाडीतील खासदार उपस्थित होते.

**टी.सी.हरवला आहे**

आदित्य गंगाधर वराडे जैन इंग्लिश स्कूल अंबड यांचा १० वी पासचा टी.सी जालना ते अंबड प्रवासादरम्यान हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधा.

संपर्क:::९४२२२१७९३९, ९९२१०५३९३९

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि.२० डिसेंबर २०२४


## आश्वासने पूर्ण होणार;योजना बंद होणार नाहीत – मुख्यमंत्री

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकरी, युवा वर्ग, ज्येष्ठ नागरिक, वंचित घटकाला दिलेली आश्वासने पूर्ण केली जातील. शासनाच्या सुरु असलेल्या योजना बंद होऊ देणार नाही, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला दिला. राज्यातील लाडक्या बहिणींना त्यांचा देय हप्ता अधिवेशन संपल्यावर देण्यात येईल,



अशी ग्वाही देत महाराष्ट्र कालही नंबर एक होता, आजही नंबर एक आहे आणि उद्याही नंबर एकच राहील, महाराष्ट्राशी कोणीही स्पर्धा करू शकत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिमानाने व आत्मविश्वासाने विधानसभेत स्पष्ट केले. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

# परभणी येथील पोलीसी अत्याचाराच्या व अमित शहा यांच्या वक्तव्याविरोधात जेलभरो आंदोलन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परभणी येथील पोलीसी अत्याचाऱ्याच्या विरोधात धार्मिक व जातीय अत्याचार विरोधी प्रतिकार समिती, अंबाजोगाईच्या जेलभरो आंदोलन करण्यात आले.यावेळी पोलिसांनी शेकडो महिला पुरुष आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले.

परभणी येथील पोलीसी अत्याचाऱ्याच्या व सभागृहात अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल चुकीचे वक्तव्य विरोधात उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालया समोर धार्मिक व जातीय अत्याचार विरोधी प्रतिकार समिती, अंबाजोगाईच्या वतीने तिव्र निदर्शने केले.

या निवेदनातील मागणी सनातनी कॉर्पोरेट सत्ता भारतात आणि महाराष्ट्र राज्यात आल्या पासून दलित अनिवासी आणि अल्पसंख्याक यांना लक्ष करून पोलीसा मार्फत याची दडपशाही केली जातेय, कधी जनातिर वर संविधान जाळले जाते तर कधी डॉ. बाबासाहेबाची प्रतिमाची विटंबना केली जाते. याचा प्रतिकार करणाऱ्या दलिताच्या जनतेला मरेपर्यंत मारझोड करणे त्याचे वस्तीत रात्री आपरात्री पोलीस कोम्बींग ऑपरेशन करतांना बाळांतीनण तरुणी शिकत असलेल्या




मुली तरुण आणि वृध्द सर्वावर बेछुट असा लाठी हल्ला, पोलीसाकडून होतो. परभणीत अशाच अमानुष हत्यात सर्व वस्त्यातील सर्व वयोगटातील स्त्री, पुरुषांना लक्ष करुन अमानुष अशी मारङ रोड केली, महिलांची, तरुणांची हाडे मोडली, बाळांतीण तरुणींना सोडले नाही, रस्त्यातील वाहने दुचाकी, तीनचाकी, चार चाकी यावर डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमा असतांनाही तोडफोड केली. सुर्यवंशी या तरुणास जी मारहान झाली ती त्याचा जिव घेण्यासाठीच झालेली होती व त्यातच त्याचा जिव घेतला गेला. तीन वर्षापुर्वी घाटनांदुर या आपल्या हद्दीतील गावातः पोलीसावर प्रचंड हल्ला झाला होता, मुस्लीम पोलीस जमादार गंभिर जखमी झाला पण पोलीसांनी आरोपींना पकडण्यासाठी कोठेही कोम्बींग ऑपणन केले नाही.

तात्पर्य, दलित आदीवासी व अल्पसंख्याकांना किडामुंगी सारखे रगडण्याची सत्ताधारी यांची जातीय मानसिकता आहे त्याचा आम्ही धिक्कार करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोरील घटना शिल्पाची मोडतोड होते, हा काही योगायोग नाही तर वैचारीक शत्रुच्या छावणीत आंबेडकरी विचार त्यांची प्रतिके याविरुध्द कायम षडयंत्र चालु आहे.तडीपार अमितशाह यानेही संसदेत डॉ. बाबासाहेबांच्या बद्दल गरळ ओकून भाजपा व संघाचा खरा चेहरा दाखविला आहे. एकेकाळी न्यायर्यालयाचा गुन्हेगार असलेला माणूस इतका सफाईदारपणे या देशात भेदभाव आणि धार्मिक ध्रुविकरण या आधारे संविधानाचा आधार घेवून उच्च अशा संविधानिक राजकीय पदावर गेला व देशाच्या सामाजिक न्याय, स्त्री स्वातंत्र, दलित आदिवासी आणि तमाम जाती धर्मातील माणूसकी नाकारलेल्या समाजाचे जे मानबिंदु आहेत त्यांच्या बद्दल लोकसभेत गरळ ओकतो त्या अमित शाहचा आम्ही तिव्र धिक्कार करतो या सर्व परिस्थितीत परभणीत जी अमानुषता घडविली गेली त्या विरोधात आम्ही निषेध म्हणून स्वतःच जेल भरो करीत आहोत.

धार्मिक व जातीय अत्याचार विरोधी प्रतिकार समिती, अंबाजोगाईच्या वतीने या जेलभरो आंदोलनात कॉ. बब्रुवाहन पोटभर, महादेव आदमाने,कल्याण भिसे,हमीद चौधरी,सुधाकर देशमुख, अशोक पालके, धीम्मंत राष्ट्रपाल, राजेश वाहुळे,अक्षये भुंबे,भिमराव सरवदे,विनोद शिंदे,अजय सरवदे, सुशिल गायकवाड, सचिन गालफाडे, राम वाघमारे,जिवन घाडगे, अशोक काळे, मुन्ना वेडे, बादल तरकसे, विशाल शेवाळे, भैय्यासाहेब सोनकांबळे, बाबा शेख, विश्वजित शिंदे आनंद मोरे,प्रितम वाघमारे,मंजुषा दादासाहेब कसबे,विद्दा आत्माराम गावडे,छाया गौतम कसबे,वैशाली मस्के,सुमन बालासाहेब कसबे,लोंढताई यांच्यासह ईतरांना ताब्यात घेऊन सोडण्यात आले.

# अतुल चव्हाण रोटरीच्या 'जलदूत' पुरस्काराने सन्मानित

## दिंद्रुडच्या ग्रा.पं.सदस्याची रोटरीकडून दखल

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

येथील तरुण ग्रा.पं. सदस्य अतुल चव्हाण यांनी अथक मेहनत करून स्वखर्चाने नागरिकांना पाण्याची व्यवस्था करून दिली. याची दखल रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल यांनी घेतली असून चव्हाण यांना मान्यवरांच्या उपस्थितीत 'जलदूत' पुरस्कार देऊन सन्मानित केले. रोटरीने केलेला हा सन्मान माझ्यासाठी प्रेरणादायी असून पुरस्कारामुळे माझी जबाबदारी आणखीच वाढली असल्याची भावना चव्हाण यांनी व्यक्त केली.

माजलगाव येथील फ्लाईंग बर्डस ॲकॅडमी च्या निसर्गरम्य प्रांगणात हा दिमाखदार सोहळा पार पडला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना जीवनगौरव, कृषिभूषण व जलदुत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. व्यासपीठावर रोटरीचे उप प्रांतपाल डॉ.शंकर जुजगर, सुधीर लातुरे, नवनिर्वाचित अध्यक्ष पांडुरंग चांडक, सचिव प्रभाकर शेटे, सुनील शिंदे, आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ.प्रकाश आनंदगावकर, शंकर मुठाळ, आण्णासाहेब जाधव, भागवत मोरे, प्रकाश जाधव, अतुल चव्हाण यांना मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार बहाल करण्यात आले. यावेळी डॉ.संजय कळमकर यांचे जगण्यातील आनंद वाटा या विषयावर बहारदार व्याख्यान झाले. गतवर्षीच्या उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागली. जानेवारी



> पाणी टंचाई असल्यास मध्यमवर्गीय व श्रीमंत लोक उन्हाळ्यात पाणी विकत घेतात. परंतु गोरगरीब जनतेने दररोज हजार पाचशे रुपये आणायचे कुठून? हा मोठा प्रश्न आहे. खास करून महिलांना पाण्यासाठी रात्री अपरात्री वणवण करावे लागत होते. महिलांचे हाल थांबविण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न केले. माझ्या या प्रामाणिक प्रयत्नाची दखल घेतल्याबद्दल रोटरीचे मनापासून आभार मानतो. – अतुल चव्हाण

महिन्यापासूनच नळाला येणारे पाणी बंद झाल्याने माजलगाव तालुक्यातील दिंद्रुडच्या नागरिकांचे हाल झाले. मात्र अतुल चव्हाण या तरुणाने तब्बल दोन ते तीन किलोमीटर अंतरावरून बोरवेल्स, विहिरी मध्ये पाईपलाईन गावात पाणी आणले. जवळपास बारा ठिकाणी १००० लिटरच्या पाणी टाक्यांमध्ये पाणीसाठा सुरू केला. पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन वापरात लागणाऱ्या पाण्यासाठी होणारी पायपीट थांबली. चव्हाण यांच्या या कार्याची दखल रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल या आंतरराष्ट्रीय संस्थेने घेऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. दिंद्रूडच्या भूमिपुत्राचा सन्मान झाल्याबद्दल गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

## जाहीर प्रगटन

**जाहिर प्रगटन देणार:**
**सौ. आशा रामप्रसाद तिवारी रा. शाहुनगर, बीड ता.जि.बीड**
**मो.नं.९७६७९२६८४९**

सर्व जनतेस कळविण्यात येते की, प्रविण दयासागर जैन रा.फुलाई नगर, बीड यांच्या मालकी व ताब्यातील र.डी.जि.प.बीड सब डि पं.स.व ता.बीड पैकी बीड नगर परिषद घर क्र.१-६-३४२६ सी.टी.एस.क्र.२४५३/२१ पैकी असून दक्ष रेसिडेन्सी, बीड येथील सदनिका क्र. १०७ (२) पहिला मजला आहे.

ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.
पूर्वेस– लोढा यांची इमारत
पश्चिमेस –जिना व पॅसेज
दक्षिणेस – सदनिका क्र. १०८
उत्तरेस – सरकारी रस्ता

ही मिळकत प्रत्यक्ष ताबे वहिवाटीतील प्रविण दयासागर जैन रा. फुलाई नगर, वीड यांच्या नावे असून सदर मिळकत त्यांची निर्विवाद असून, कर्जविरहित आहे. सदरील मिळकत आरक्षणाविरहित आहे. तसेच सदरील मिळकतीवर कुठल्याही सरकारी निमसरकारी अथवा खाजगी कर्ज बोजा नाही. निघाल्यास त्याची फेड करण्याची जबाबदारी प्रविण दयासागर जैन यांचेवर राहील. सदरील मिळकतीचा व्यवहार मी तुमचेशिवाय इतर कोणाशीही केलेला नाही. तसेच मिळकत मी यापुर्वी कोणास दान, गहाण, तारण, बक्षीस, विक्री, भाडेपत्र, ईसारपावती, मुखत्यारपत्र या मार्गाने व इतर अन्य कुठल्याही मार्गाने हस्तांतरीत केलेली नाही किंवा तसा लेखी अथवा तोंडी करार देखील केलेला नाही. तसेच आढळून आल्यास त्यास मी जबाबदार राहील. त्याची तोषीस तुम्हास लागु देणार नाही.

तरी कोणीही इसम भागीदारी फर्म, सदर मिळकती संबंधात्? सदर मिळकतीच्या चतुः सिमेतील रहिवाशी यापैकी कोणाचीही वरील मिळकतीवर व त्याच्या कोणत्याही भागावर खरेदी, गहाण, अदलाबदल, भाडेहक्क, कौटुंबिक व्यवस्था, बोजा, पट्टयाने वहिवाटीचे वारस, बक्षीस, विकसन, अधिकार, करार, करारनामा, तडजोड, ताबा, वहिवाटीचे अधिकार, न्यायालयाचे आदेश हुकूम इत्यादी वा ईतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन ०७ दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी हरकत देवून पोहच घ्यावी, अन्यथा वरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क हितसंबंध नाही असे समजून वरील मिळकत निर्वावाद व निर्जाख व निर्जोखमी असल्याचे ग्राहय धरून विक्रेत्याकडून कायदेशिर खरेदीखताव्दारे कायम खरेदी करण्यात येईल व मालक म्हणून सौ. आशा रामप्रसाद तिवारी हे पुढील व्यवहार पूर्ण करतील व पुढील कार्यवाहीस व वादास जबाबदार राहणार नाहीत.

सबब हे जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.
ठिकाण :– बीड
दिनांक : १९.१२.२०२४

जाहिर प्रगटन देणार
**सौ. आशा रामप्रसाद तिवारी**
रा. शाहुनगर, बीड ता. जि.बीड
मो.नं.९७६७९२६८४९

**ॲड.एस.आर.राजपूत**
**मो.९४२१३४५३४६**

पान ६ वरून...

## स्टुडन्ट रिलीफ सोसायटीच्या

असावी. या संस्थेकडून प्रशिक्षण नियमा प्रमाणे घेतले जात नाही. शासन निर्णयाप्रमाणे पन्नास ची एक बॅच असावी मात्र एकाच हॉलमध्ये दीडशे ते दोनशे लोक बसवून प्रशिक्षण घेतले जाते आणि त्यानंतर कागदावर वेगवेगळ्या बॅच दाखवल्या जातात. मेळावे पद्धतीने प्रशिक्षण घेतले जात आहे.यामुळे शासनाचा उद्देश सफल होत नाही. शासन स्तरावरून केला जाणारा प्रशिक्षणावरील खर्च वाया जाताना दिसून येत आहे. या ठिकाणी प्रोजेक्टर फक्त दाखवण्यापुरता ठेवला जात आहे. प्रशिक्षण स्थळी पायाभूत सुविधांचा अभाव दिसून येत आहे. संबंधित विभागाचे काही कर्मचारी हाताखाली धरून हे प्रशिक्षण पूर्ण केले जात आहे. प्रवीण प्रशिक्षकाच्या भाषेचा मोठ्या प्रमाणात आभाव दिसून येत आहे. लाभार्थ्यांच्या पहिल्याच दिवशी दोन वेळा सह्या घेतल्या जातात. आणि कोरम पूर्ण केला जातो. बीड येथील प्रशिक्षणाला भेट दिली असता या सर्व बाबी निदर्शनास आल्या. शासन निर्णयानुसार जिल्ह्यात प्रशिक्षण देण्यासाठी जिल्ह्यातील प्रवीण प्रशिक्षकांना घेण्यात यावे असा शासनाचा निर्णय आहे. या संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लक्ष घालून स्थानिक प्रशिक्षकांना प्रशिक्षणाचे काम द्यावे असे मागणी संघटनेचे अध्यक्ष संजय आंधळे, सचिव गौतम वाघमारे, भास्कर पिंपरीकर बाजीराव ढाकणे आदींनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनाही निवेदनाव्दारे कळवले आहे.

## लक्ष्मण आण्णांनी विधानसभा

तुमचा प्रश्न मार्गी लागेल असा शब्द दिला होता

विधानसभा निवडणुकी दरम्यान संजयनगर वासियांना दिलेला शब्द मा.आ.लक्ष्मण आण्णांनी पाळला आज.दि.१० डिसेंबर रोजी संजयनगर येथील लाईटचे पोल उभारण्यात येऊन त्यावर विद्युत तार घेऊन संजयनगर येथील रहिवाशांची अडचण काय्यमची मार्गी लावली यावेळी मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी,बाळासाहेब गायकवाड, शेख बाबा,शेख शौकत,.व नागरिक उपस्थित होते अनेक वर्षापासूनची अडचण दुर केली त्याबद्दल नागरिकांनी लक्ष्मण आण्णांनचे आभार व्यक्त केले आहे.

## माजी आ.भीमराव धोंडे

कोठे कमी पडलो ? प्रचारयंत्रणेत आपण कमी पडलो का ? यावर चिंतन आणि विचार मंथन करण्यासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी दि.२१ डिसेंबर रोजी आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालयात सकाळी ११.३० वाजता कार्यकर्ता चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. आष्टी,पाटोदा,शिरुर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. अजयदादा धोंडे मित्र मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

## परभणी आणि मस्साजोग

तुटेपर्यंत आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना मारत आहे. त्याचे व्हिडीओ पण पोलिस यंत्रणेने पाहावेत. अशा गुंडावर कठोर कारवाई व ॲट्रासिटी ॲक्टनुसार गुन्हा नोंद व्हावा. संबंधीत पोलिस अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा ३०२ चा गुन्हा दाखल करून या प्रकरणाची तपासणी सी.बी.आय.मार्फत करावी. तसेच संविधानाच्या प्रतीची तोडफोड करणाऱ्या आरोपीच्या पाठीमागे मास्टर माइंड कोण याची पण सी.बी.आय.मार्फत चौकशी करावी. तसेच मस्साजोग (ता.केज,जि.बीड) येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या प्रकरणात पोलीसाची भुमिका प्रचंड संशयास्पद आहे. आरोपींना अटक करून पोलिसांना सहआरोपी करून या सर्वांवर ३०२ चा गुन्हा दाखल करावा. संबंधित प्रकरणाचा मास्टर माइंड कोण आहे..? याची सुध्दा सी.बी.आय. मार्फत चौकशी करून कठोर कारवाई करावी. अशी मागणी करण्यात आली आहे. सदरील आंदोलनात भिमशक्तीचे जिल्हा संघटक धीमंत राष्ट्रपाल, भिमशक्तीचे जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हा संघटक रत्नदीप सरवदे, मनोज पाडुळे, चंद्रकांत यादव, परमेश्वर सरवदे, संतोष पाडुळे, सुदर्शन सरवदे, बबलू जामदार, सुरज गायकवाड, कैलास पाडुळे, अखिल पठाण व गावातील ज्येष्ठ नागरीक, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/७४४
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :– १८/१०/२०२४

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) अंबादास अहिलाजी मुंजाळ रा. अंबड ता. अंबड जि जालना सर्व्हे नं. १० सहन प्लॉट नं. ३१ सि.स.नं. १८–६६/अ/३१ न.प.मि.न.१८ –९९–३१ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८–९९–३१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व– प्लॉट नंबर ३२
पश्चिम : प्लॉट नंबर ३०
दक्षिण– याच सर्व्हे नंबर मधील भाग
उत्तर : १२ मिटर रुंदीचा डीपी रोड

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

पान ६ वरून...

## रोटरी क्लब व भिमसेन लोमटे मित्र

कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, युवा नेते भिमसेन लोमटे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ बालासाहेब लोमटे,डॉ.चैतन्य आदमाने, डॉ.निशिकांत पाचेगावकर,संतोष मोहिते, बाळासाहेब कदम,गोपाळ पारीख,स्वप्नील परदेशी,गणेश राऊत यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना बबन लोमटे म्हणाले की समाजाशी रक्ताने नाते जोडण्याची किमया रक्तदान शिबिराच्या माध्यमातून होते. भिमसेन लोमटे मित्रमंडळाने हा सामाजिक उपक्रम राबवून गरजू रूग्णांना दिलासा दिला आहे. यावेळी बोलताना भिमसेन लोमटे म्हणाले की समाजातील उपेक्षित, वंचित व्यक्तींसाठी आमचे काम सुरूच आहे. मित्रमंडळ व रोटरी क्लब यांच्या माध्यमातून आगामी काळात अनेक सामाजिक उपक्रम राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कल्याण काळे,डॉ. निशिकांत पाचेगावकर,संतोष मोहिते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिरात १०१ रक्तदात्यानी रक्तदान केले. या कार्यक्रमास भिमसेन लोमटे मित्रमंडळ,व रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते.

## देशमुख खून प्रकरणातील

तसेच देशाच्या संसदेतही या विषयावर चर्चा झाली आहे. परंतु, एवढे दिवस उलटूनही मुख्य आरोपी वाल्मिक कराड व सुदर्शन घुले हे अजूनही फरार आहेत, हे अत्यंत दुर्दैवी आहे. या प्रकरणात काही गंभीर शंकांना वाव आहे. १) या फरार आरोपींना पकडण्यात पोलीस यंत्रणा का अयशस्वी ठरत आहे..?, २) आरोपींना कोणत्याही प्रभावशाली व्यक्तीकडून आश्रय किंवा संरक्षण मिळत आहे का..?, ३) जर आरोपींनी जामिनासाठी न्यायालयाचा पर्याय निवडला असेल, तर त्यांनी पकडले जाण्याआधी पोलिसांकडून योग्य ती कार्यवाही का होत नाही..? त्यामुळे सरकारने या घटनेची दखल घेऊन ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. अन्यथा, सामान्य जनतेमध्ये सरकार आणि पोलीस यंत्रणेबद्दल विश्वास कमी होईल आणि गुन्हेगारांना संरक्षण मिळत असल्याचा चुकीचा संदेश जाईल. तरी आम्ही आपणांस विनंती करतो की, मस्साजोग प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड, विष्णु चाटे, सुदर्शन घुले आणि त्यांच्या साथीदारांवर मोक्का (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा) अंतर्गत त्वरित कारवाई करावी. तसेच, या प्रकरणाचा तपास जलदगतीने पूर्ण करून गुन्हेगारांना कठोर शिक्षेसाठी न्यायालयात हजर करण्यात यावे. जर या प्रकरणात वेळेवर आणि प्रभावी कारवाई झाली नाही, तर सामान्य नागरिकांचा सरकारवरील विश्वास डळमळीत होईल आणि कायद्याची भीती गुन्हेगारांमध्ये राहणार नाही. आपण या विषयाची तातडीने दखल घेऊन योग्य त्या उपाययोजना कराल, अशी अपेक्षा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. सदरील निवेदनाच्या प्रती उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना देण्यात आल्या आहेत.

## तर बोगस गुंठेवारीधारकांवर

घडत असुन त्यांची वरकमाई जोरात आसल्याचे ऐकावयास मिळत आहे तर या बोगसगिरीमुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसुलला मात्र हरताळ फासल्या जात आसल्याचे दिसुन येत असुन प्लॉट खरेदी करणार्या सर्वसामान्य खरेदी दारांचीही यातुन घोर फसवणुक होतांना दिसुन येत आसुन या बाबत काही तक्रारी आल्यास त्याची पडताळणी करुन संबंधितावर कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे वडवणी न.प. चे मुख्याधिकारी श्री पि. एन. निगळ यांनी सांगितले.'' फक्त जागेच्या पि.टी.आर . वरुन दस्त नोंदणी करुन नये तसेच दस्त नोंदणी साठी दाखल केलेली गुंठेवारी प्रमाणपत्र नगर पंचायत कडे पडताळणीसाठी पाठवुन मगच दस्त नोंदण्या कराव्यात असे आम्ही न.प. चे लेखी पत्र निबंधक कार्यालयास दिलेले आहे – श्री पि.एन. निखळ , मुख्याधिकारी न.प. वडवणी

## सेवानंद महिला ग्रुपच्या वतीने

प्रा.स्नेहल पाठक यांनी सांगितले की, मुख्याध्यापक निळकंठ जाधव हे उपक्रमशील मुख्याध्यापक होते.आयोजकता, कल्पकता हे त्यांचे गुण होते.प्रा. संगीता जाधव यांनी कै.निळकंठ जाधव यांच्या अकाली निधनाने आमच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळल्याचे सांगितले. मुख्याध्यापक कै. निळकंठ जाधव यांच्या स्मृती प्रित्यर्थ १० वी वर्गातून प्रथम येणार्या विद्यार्थ्याला बक्षीस जाहीर केले.अध्यक्षीय समारोप उज्वला होके पाटील यांनी केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालासाहेब झोडगे यांनी केले.यावेळी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भास्कर पारगावकर, आप्पासाहेब होके, मुरलीधर भाळशंकर,माधव घोलप,सय्यद गयास,दत्तात्रय इंगळे,मिलिंद देशपांडे,अनंत राठोड,सत्यप्रिया होके पाटील, फरजाना पठाण, स्मिता डाके,शिल्पा शिनगारे,पंकज कळसकर, तुळशीराम साळवे, शेख शहानूर , ज्ञानेश्वर पवार, दत्तात्रय पांडे, दिनकर काळे यांच्यासह सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/७४३
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :– १८/१०/२०२४

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) वैशाली गंगाधर वराडे रा. अंबड ता. अंबड जि जालना सर्व्हे नं. ३४/१ प्लॉट नं. १० सि.स.नं. ३५–०५ न.प.मि.न.१८ –१७७ –१० चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८ –१७७–१०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व– ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :याच लेआउट मधील ओपन स्पेस
दक्षिण– दिपक पांडुरंग खरात यांचे घरे
उत्तर : १५ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत डीपी रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

## जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अंबड जि. जालना, कार्यालय अंबड
दुरध्वनी क्रमांक ०२४८३–२७५०२६
जा.क्र.२०२४ /सेतु /कावि–१४५५ दिनांक: २१/१०/२०२४
Email-id-tehsildarambad@gmail.com

अर्जदार– मंगलबाई बाबुराव सानप रा. वठाण खु.
विरुध्द
ग्रामपंचायत कार्यालय नगर परिषद वठाण खु. ता.अंबड

विषय– कलम १३(३) जन्म – मृत्यू नोंदणी कायदा प्रमाणे जन्म मृत्यू प्रमाणपत्र मिळणेबाबत तलाठी / ग्रामसेवक मधील जाहीर प्रगटण करणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार नामे मंगलबाई बाबुराव सानप रा. वठाण खु. ता. अंबड जि. जालना येथील राहिवाशी असुन अर्जदार यांनी त्यांच्या पती नामे माझे बाबुराव गणपत सानप यांची त्यांनी मृत्यूची यांची मृत्यू दि. ०३/०२/२०१२ रोजी वठाण खु असल्याचे अर्जात नमूद केले असुन त्या अनुशंगाने त्यांनी मृत्यू प्रमाणपत्र आदेश मिळण्यासाठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते कि, जन्म/मृत्यू नोंद बाबत कोणाचाही कोणताही अक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी स्वरूपात अक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबधित प्रकरणात कायदयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि. २१/१०/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार अंबड**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/७९९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :– २८/११/२०२२

**नाव बदलण्याचा**
**जाहिरनामा**

अर्जदार श्री./सौ. श्रीमती: आबासाहेब नामदेव सरोदे, २. रेखा आबासाहेब सरोदे

प्रकरण सर्वे नं ३७/२ मधील प्लॉट नं ९३ न.प. मि. नं १८–६३–९३/१ हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमता घर क्र. (९३) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पूर्व :– विजय विठोबा ससाणे यांची जागा
पश्चिम :– भाऊ सुज्ञान निर्मळ या यांचा प्लॉट नं ९२ मधीस भाग
दक्षिण :– ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता.
उत्तर प्लॉट नंबर ९६ व ९७

**स्वाक्षरित/–**
**मुख्याधिकारी, नगर परिषद, अंबड**

## जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २६६/२०२४
रामचंद्र दामोधर गिरे –विरुध्द ग्रा.पं. लिंबागनेश
पहा
१. रामचंद्र दामोधर गिरे,रा. लिंबागणेश ताजि–बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत जनाबाई दामोधर भिरे यांचा दिनांक २/१०/२०१८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास लिंबागणेश ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे लिबागणेश ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २७/०१/२०२५ ही आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार बीड**

## जाहीरनामा

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, आष्टी जि. बीड
(दंड–विभाग) दूरध्वनी – (०२४४१)२८२५४२
क्र.२०२४/दंड/जन्म–मृत्यू नोंदणी/कावि/२०७५
Email-id:tehsildarashti@gmail.com दि.१२/१२/२०२४
जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जन्म आणि मृत्यूची नोंदणीरे सुधारणा कायदा २०२३ मधील कलम ११०) अन्वये

सर्व जनतेश मौजे जामगाव ता. आष्टी यांना जाहीर केले जाते कि अर्जदार श्री. ज्ञानदेव नामदेव रणसिंग रा. जामगाव ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांचा मुलगी नामे आयेशा ज्ञानदेव रणसिंग हिचा जन्म दि. १०/१०/२०१० रोजी मौजे जामगाव ता. आष्टी येथे झाला असुन अर्जदाराला सदरहू जन्मची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे मुलीचे कायदेशीर जन्मचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समाजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावर असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोद कायदेशीर असल्याबबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १२/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/–**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब**
**तहसिलदार, आष्टी**

# द्राक्ष बागायतदारांचे कंबरडे मोडले !

## विमा कंपन्यांची अधिकाऱ्यांची रवानगी येरवड्यात करा रोहित पाटील यांचा अधिवेशनात घणाघात


नागपूर : राज्याचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले आहे. अधिवेशनाच्या तिसरा दिवस शेतकऱ्यांच्या विविध मुद्द्यांनी गाजला. यावेळी अनेक आमंदारांनी शेतकरी आणि शेतीच्या प्रश्नावरून सरकारला घेरले. यावेळी तासगाव कवठेमहाकाळचे आमदार रोहीत पाटील यांनी सांगली जिल्ह्यातील द्राक्ष बागायत दारांचा प्रश्न सभागृहात मांडला. यावेळी त्यांनी, माझ्या जिल्ह्यातील द्राक्ष बागायदारांचे कंबरडे मोडत आहे, मात्र सरकारला जाग नाही, असा घणाघात केला.

सभागृहात अधिवेशाच्या तिसऱ्या दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान रोहीत पाटील यांनी, राज्यपाल राज्य सरकारने कृषी क्षेत्राला प्रोत्साहन दिल्याचे सांगत आहेत. मात्र नाशिकनंतर सर्वाधिक द्राक्षाचे उत्पन्न माझा मतदारसंघ असणाऱ्या जिल्ह्यात होते. गेली १० वर्ष झाली कापूस आणि सोयाबीनच्या दरासाठी आंदोलन केली गेली. द्राक्षाला हमीभाव मिळावा यासाठी आम्ही आदोलन उभारूनही सरकारने याकडे लक्ष दिले नाही, असा आरोप रोहीत पाटील यांनी केला. गेल्या तीन ते



चार वर्षात उत्पादना यात घट झाली आहे. याला कारण सरकारचे धोरण असून १८ टक्के शेतीविषयक औषधांवर जीएसटी, बेदाणा दरावर शासनाचे बंधन नाही. आणि कोल्डस्टोरेजमध्ये ठेवायचा म्हटले तरी ११ टक्के जीएसटी द्यावा लागतो. तर निसर्गाच्या लहरीपणामुळे द्राक्ष उत्पादकाचे आज कंबरडे मोडले आहे. कर्जाचा बोजा वाढत आहे. यामुळे नुकसान भरपाईची मागणी शेतकरी करत आहेत, असे ते म्हणाले. महाराष्ट्रातील, शेतकऱ्यांना पीकविम्याचा मोबदला मिळण्यात विमा कंपन्यांच्या अमानुष कारभारामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो आहे. या अन्यायामुळे अनेक शेतकऱ्यांना आत्महत्येसारख्या टोकाच्या पावलांपर्यंत जावे लागते, ही परिस्थिती अत्यंत दुर्दैवी आणि असह्य असल्याचे ते म्हणाले. राज्यात संत्रा, मोसंबी, केळी, द्राक्ष, पेरू, डाळींब, काजू, पपई या सगळ्या पिकांना विम्याचे संरक्षण मिळत आहे. हंगामी पिकासाठी १ रूपयांचा पिक विमा हप्ता मिळतो. मात्र यालादेखील राज्य सरकारकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने हजारो शेतकरी पिक विमा योजनेकडे पाठ फिरवत आहेत. विमा कंपन्यांच्या माध्यमातून होणारी शेतकऱ्याची पिळवणूक थांबवण्यात यावी, अशी मागणी रोहीत पाटील यावेळी केली.

## तरूण शेतकऱ्याने एका एकरात काढले ११० क्विंटल बटाटा उत्पादन



वाशीम : वाशीम जिल्हयात शेतीमध्ये प्रयोगशीलता वाढत आहे. रिसोड तालुक्यातील लोणी येथील स्वप्निल विजय गाडे या तरुण पदवीधर शेतकऱ्याने खरिपात एक एकरात बटाट्याची लागवड करीत चांगले उत्पादन मिळवले आहे. हा भाग खरिपात केवळ सोयाबीन पिकावर अवलंबून असून अशा भागात स्वप्निलने नवीन प्रयोग केला. बटाट्याला जागेवरच २२ रुपये प्रतिकिलोचा दरही मिळाल्याने हा प्रयोग कमालीचा यशस्वी झाला आहे.

गाडे कुटुंबाकडे ३२ एकर शेती आहे. स्वप्निल एमएसस्सी बीएड झालेला असून दीड वर्षांपूर्वी वडिलांचे निधन झाल्यानंतर शेतीत उतरला आहे. त्यांच्याकडे आधी पारंपरिक पीक पद्धतीने सोयाबीन आणि तूर हीच खरिपाची पिके होती. तर रब्बीत गहू, हरभरा या भागात घेतल्या जातो. हलकी ते मध्यम स्वरूपाची जमीन आहे. काही माती लालसर सुद्धा आहे. त्यांच्याकडे भारी जमिनीचे क्षेत्र फक्त दीड ते दोन एकर एवढेच आहे. अशा आव्हानात्मक भागात स्वप्निलने यंदा सोयाबीनऐवजी काही क्षेत्रात बटाटा लागवड करण्याचे ठरवले. पाठीशी वडील व त्यांचे मार्गदर्शन नसल्याने नवीन काही करायला मनात भीतीसुद्धा वाटत होती. म्हणून एक एकरावरच बटाटा लागवड करण्याचा प्रयोग केला. या भागात पहिल्यांदाच बटाट्याची लागवड या गाडे कुटुंबाने केली. ठिबकचा वापर केला. बटाट्यावर मुख्यतः लाल कोळी आणि करपा येतो. सुरुवातीपासूनच योग्य काळजी घेतल्याने हे दोन्ही प्रकार नियंत्रणात राहिले. एक एकरासाठी बियाणे व इतर खर्च मिळून ४० हजारांपर्यंत संपूर्ण खर्च लागला होता. या क्षेत्रात ११० क्विंटल उत्पादन झाले. जागेवरच बटाट्याला २२०० रुपये प्रतिक्विंटल असा दर मिळाल्याचे स्वप्निल गाडे यांनी सांगितले.

## रंगीबेरंगी फुलकोबीची लागवड पद्धती

रंगीत फुलकोबीच्या लागवडीसाठी ४ ते ५ आठवड्याच्या रोपांची शेतात ६० बाय ६० सें.मी. आणि ६० बाय ४५ सें.मी. अंतरावर लागवड करावी. रोपे पुनर्लागवड नंतर पिकाला हलके सिंचन देणे आवश्यक आहे.

खत व्यवस्थापन : कुजलेले शेणखत उपलब्ध असल्यास लागवडीच्या १५ दिवस अगोदर १०० क्विंटल शेणखत आणि कंपोस्ट खताची संपूर्ण मात्रा शेतात मिसळावी. ४५ ते ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि १५-१६ किलो पालाश प्रति एकर वापरावे. स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा आणि अर्धी नत्राची मात्रा लागवडीच्या १५ दिवस आधी शेतात टाकून चांगले मिसळावे. नत्राची उर्वरित मात्रा दोन समान भागांमध्ये विभागून पुनर्लागवडीनंतर ३०-३५ आणि ४५ ते ५० दिवसांनी टॉप ड्रेसिंग म्हणून द्यावे. याशिवाय जमिनीत तण काढताना व मशागत करताना ६०० ग्रॅम अमोनियम मॉलिब्डेट आणि ५ किलो बोरॉन प्रति एकर जमिनीतून द्यावे.

सिंचन आणि तण नियंत्रण : पिकाच्या यशस्वी लागवडीसाठी रोपाची लागवड केल्यानंतर गरजेनुसार १० ते १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. रंगीत फुलकोबी लागवडीनंतर तीन आठवड्यांनी खुरपणी करून मातीची भर द्यावी. यानंतर गरजेनुसार खुरपणी करावी.

कीड आणि रोगांचे व्यवस्थापन : रंगीबेरंगी फुलकोबीमध्ये डायमंड बॅक मॉड आणि मस्टर्ड फ्लाय या मुख्य किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सेंद्रिय औषध बॅसिलस थूरिंगिएन्सिसच्या द्रावणाची फवारणी करावी, असे प्रौढ कीटक पकडण्यासाठी फेरोमोन सापळ्यांचा वापर करावा. रंगीत फुलकोबीमध्ये मर रोगास प्रतिबंध करण्यासाठी ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी.

शेतात २० ग्रॅम प्रति चौरस मीटर या दराने जमिनीत कंपोस्ट खत मिसळून वापरा. हा रोग आढळल्यास रोपवाटिकेला पाणी देऊ नका. इतर प्रमुख रोगात काळी सड रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोगट झाडे गोळा करून नष्ट करावीत. हा रोग टाळण्यासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड आणि स्ट्रेप्टोसायक्लिन २०० पीएम या द्रावणाची फवारणी करावी.

काढणी आणि उत्पादन : रंगीबेरंगी फुलकोबीचे पीक लागवडीनंतर १०० ते ११० दिवसांनी काढणीसाठी तयार होते. पिकाचे सरासरी एकरी १०० ते १२५ क्विंटल उत्पादन मिळते.

एक एकरात फुलकोबीची लागवड केल्यास सुमारे ५० हजार रुपये खर्च येतो. बाजारात ते २५ रुपये किलोने सहज विकले जाते. अशा प्रकारे १०० क्विंटलपासून एकूण उत्पन्न सुमारे अडीच लाख रुपये होईल. निविष्ठा खर्च कमी केल्यास शेतकर्याला २ लाख रूपयांचा निव्वळ नफा मिळेल.



## पिकातील सुत्रकृमींचा प्रादुर्भाव आणि एकात्मिक नियंत्रण

वेगवेगळ्या पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळतो. या रोगाची सुरुवातीची लक्षणे दिसून येत नसल्यामुळे उपाय योजना करायला उशीर होतो व त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. काही पिकांच्या उत्पादनात सूत्रकृमींमुळे १२ ते १३ टक्के घट होते. जाणून घेऊ या सुत्रकृमी रोगाची सुरुवातीची लक्षणे व त्यावर करायचे एकात्मिक नियंत्रण उपाय.

प्रसाराची कारणे : प्रादुर्भावग्रस्त जमिनीत वापरली जाणारी शेती अवजारे, चप्पल व बूट यासोबत येणाऱ्या मातीमधून सूत्रकृमीचा प्रसार होऊ शकतो. प्रादुर्भावग्रस्त रोपे, बेणे यांच्यामार्फत प्रादुर्भावग्रस्त जमिनीतून वाहणाऱ्या पाण्यामुळे सूत्रकृमी शेतात येऊ शकतात. पक्षी किंवा कीटका मार्फतही या रोगाचा प्रसार होतो.

सुत्रकृमीच्या गाठी कशा ओळखायच्या?

सुत्रकृमीमुळे झालेल्या गाठी ओळखणे अवघड असते. सूत्रकृमींच्या प्रादुर्भावामुळे पिकांच्या मुळावर वैशिष्ट्यपूर्ण गोलाकार सूज येऊन गाठी तयार होतात. डाळवर्गीय पिकांच्या मुळावरील गाठी आणि सूत्रकृमींच्या गाठी यामध्ये गोंधळ होऊ शकतो, मात्र त्यामधील फरक लक्षात घ्यावा. डाळवर्गीय पिके उदा. हरभरा, मूग, मटकी, उडीद, तूर किंवा तेलबिया पिके उदा. सोयाबीन, भुईमुग यांच्या मुळावर असलेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होतात. त्या पूर्णपणे गोलाकार आणि काही प्रमाणात लालसर असतात. या गाठी नत्र स्थिरीकरण करणाऱ्या उपयुक्त जिवाणूंमुळे तयार होतात. सूत्रकृमीच्या प्रादुर्भावामुळे तयार झालेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होत नाहीत. या गाठी म्हणजे मुळाचीच जादा झालेली बाह्य वाढ असते. या गाठींचा रंग मुळाप्रमाणेच असतो.



पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भावाची लक्षणे : पिकांच्या मुळ्या वेड्यावाकड्या होतात. पिकांना मुळाकडून पाणी व अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मुळांची व पर्यायाने पिकांची वाढ खुंटते. पाने पिवळी पडलेली दिसतात. जमिनीमध्ये पाण्याचा अंश पुरेसा असतानाही पीक सुकल्यासारखे दिसते किंवा झाड संपूर्ण सुकते. भाजीपाला पिकात सुत्रकृमीच्या गाठींना तडे जाऊन त्या उघड्या पडतात. फुले, फळे कमी लागतात. जास्त प्रादुर्भावाच्या स्थितीत असे पीक मरून जाते. मोठ्या झाडामध्ये सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊन झाडाझुडपांची वाढ मंदावते.

सूत्रकृमी नियंत्रणाचे एकात्मिक उपाय : उन्हाळ्यामध्ये जमिनीची खोलवर नांगरट करावी. पिकांची फेरपालट करावी. पिकामध्ये झेंडूची लागवड हा सूत्रकृमींच्या व्यवस्थापनासाठी उत्तम उपाय आहे. मिश्र पिकांची लागवड करावी. धैंचा, ताग यासोबतच मूग, उडीद, चवळी या सारखी द्विदल वर्गीय किंवा हिरवळीची पिके घ्यावीत. सेंद्रिय खते उदा. निंबोळी किंवा एरंड पेंड १.५ ते २ टन प्रति हेक्टर या प्रमाणात १५ दिवस अगोदर वापर करून पाणी द्यावे. सूत्रकृमींचा प्रादुर्भाव नसलेल्या किंवा प्रतिकारक रोपांचा वापर करावा. पॅसिलोमायसिस लिलियानस ही मित्र बुरशी सूत्रकृमींची नैसर्गिक शत्रू आहे. पॅसिलोमायसिस लिलियानस प्रमाणेच स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी यांची १० ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात बीज प्रक्रिया करावी. जमिनीत शेणखतातून पॅसिलोमायसिस लिलियानस, स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी या पैकी एक ५ ते १० किलो प्रमाणात १०० किलो संपूर्ण कुजलेल्या, ओलसर शेणखतात मिसळून प्रति हेक्टरी जमिनीत किंवा फळझाडांना खोडालगत मातीत मिसळून हलके पाणी द्यावे. फ्लुयोपायरम (३४.४८ % एससी) २५० ते ३०० मि.लि. प्रति एकर या प्रमाणात आळवणीद्वारे द्यावे. किंवा ॲबामेक्टीन (१.८ ईसी) ४० मि.लि. प्रति १०० लिटर पाणी या प्रमाणे मिसळून जमिनीमधून द्यावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८९८ : पियरे आणि मेरी क्यूरी यांनी रेडियम चा शोध लावला.
१९०५ : स्वातंत्र्यवीर सावरकर बी. ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाले.
१९०९ : अनंत कान्हेरे यांनी नाशिकचे जिल्हाधिकारी जॅक्सन यांचा गोळ्या घालून वध केला.
१९१३ : ऑर्थर वेन यांनी लिहिलेले जगातील पहिले शब्दकोडे न्यूयॉर्क वर्ल्ड या दैनिकात प्रकाशित झाले.
१९५२ : सोवियत संघाचा लेनिन शांती पुरस्कार मिळवणारे सैफुद्दीन किचलू पहिले भारतीय बनले.
१९६५ : दादा कोंडके निर्मित व दिग्दर्शित आणि वसंत सबनीस लिखित 'विच्छा माझी पुरी करा' या नाटकाचा पहिला प्रयोग धोबीतलाव येथील रंगभवन येथे झाला.
१९७१ : कर्ट वाल्डहाइम संयुक्त राष्ट्र संघाचे चौथे सरचिटणीस बनले.
१९७५ : मेडागास्कर या देशाने संविधान लागू केले.
१९८६ : रघुनंदन स्वरुप पाठक यांनी भारताचे १८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९८ : नेपाल चे प्रधानमंत्री गिरिजा प्रसाद कोइराला यांनी राजीनामा दिला.
२०१२ : आजच्या दिवशी गंगनम स्टाइल हे कोरियन गाण्याला यु ट्यूब वर १ अब्ज लोकांनी पाहिले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०४ : बेंजामिन डिझरेली इंग्लंडचे पंतप्रधान (मृत्यू: १९ एप्रिल १८८१)
१८२४ : जेम्स पार्किन्सन कंपवाताचा मानवी मेंदूशी संबंध आहे, हे सिद्ध करणारा शास्त्रज्ञ (जन्म: ११ एप्रिल १७५५)
१८९१ : श्रमिक आंदोलनाचे सूत्रधार प्रणेता ठाकुर प्यारेलाल सिंह यांचा जन्म.
१९०३ : भालचंद्र दिगंबर तथा आबासाहेब गरवारे प्लॅस्टिक व नायलॉन उद्योगाचे जनक, महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील एक प्रमुख शिल्पकार, पद्मभूषण, डि. लिट. (पुणे विद्यापीठ), उद्योजक (मृत्यू: २ नोव्हेंबर १९९०)
१९९७ : निवृत्तीनाथ रावजी पाटील ऊर्फ 'पी. सावळाराम' भावगीतलेखक. कुसुमाग्रज यांनी त्यांना 'जनकवी' ही उपाधी दिली.
१९१८ : कुर्त वाल्ढहाईम संयुक्त राष्ट्रांचे चौथे सरचिटणीस (मृत्यू: १४ जून २००७)
१९२१ : पी. एन. भगवती भारताचे १७ वे सरन्यायाधीश
१९३२ : भारतीय लेखक, कवी आणि समीक्षक यू.एन. अनंतमूर्ती यांचा जन्म. (मृत्यू: २२ ऑगस्ट २०१४)
१९४२ : हू जिंताओ चीनचे राष्ट्राध्यक्ष
१९५० : ड्रीमवर्क्स ॲनिमेशनचे सहसंस्थापक जेफरी कॅझनबर्ग यांचा जन्म.
१९५४ : ख्रिस एव्हर्ट लॉइड अमेरिकन लॉन टेनिस खेळाडू
१९५९ : कृष्णम्माचारी श्रीकांत धडाडीचे आघाडीचे फलंदाज, क्रिकेट कप्तान व निवड समितीचे अध्यक्ष
१९५९ : फ्लॉरेन्स ग्रिफिथ जॉयनर अमेरिकेची धावपटू (मृत्यू: २१ सप्टेंबर १९९८)
१९६३ : हिंदी चित्रपट अभिनेते गोविंदा यांचा जन्म.
१९६३ : जॅक हॉब्ज इंग्लिश क्रिकेट खेळाडू (जन्म: १६ डिसेंबर १८८२)
१९७२ : भारतीय पत्रकार आणि राजकारणी वाय. एस. जगनमोहन रेड्डी यांचा जन्म.
१९७४ : "रॅमन मॅग्सेसे पुरस्कार" विजेते संजीव चतुर्वेदी यांचा जन्म.
१९७९ : नरहर रघुनाथ तथा न. र. फाटक चरित्रकार, टीकाकार, इतिहास संशोधक, संत साहित्याचे अभ्यासक व लेखक (जन्म: १५ एप्रिल १८९३)
१९८१ : छत्तीसगड चे सामाजिक क्रांती चे नेते सुंदरलाल शर्मा यांचा जन्म.
१९८५ : मधे जयसिंगपूर येथे झालेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. (जन्म: ४ जुलै १९१४)
१९९३ : मल्हार रंगनाथ तथा राजाभाऊ कुलकर्णी स्वातंत्र्यसैनिक आणि पत्रकार (जन्म:)
१९९७ : पं. प्रभाशंकर गायकवाड सनईवादक (जन्म:)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२४ : जेम्स पार्किन्सन कंपवाताचा मानवी मेंदूशी संबंध आहे, हे सिद्ध करणारा शास्त्रज्ञ (जन्म: ११ एप्रिल १७५५)
१९६३ : जॅक हॉब्ज इंग्लिश क्रिकेट खेळाडू (जन्म: १६ डिसेंबर १८८२)
१९७९ : नरहर रघुनाथ तथा न. र. फाटक चरित्रकार, टीकाकार, इतिहास संशोधक, संत साहित्याचे अभ्यासक व लेखक (जन्म: १५ एप्रिल १८९३)
१९९३ : मल्हार रंगनाथ तथा राजाभाऊ कुलकर्णी स्वातंत्र्यसैनिक आणि पत्रकार (जन्म:)
१९९७ : निवृत्तीनाथ रावजी पाटील ऊर्फ 'पी. सावळाराम' भावगीतलेखक. कुसुमाग्रज यांनी त्यांना 'जनकवी' ही उपाधी दिली. १९८५ मधे जयसिंगपूर येथे झालेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. (जन्म: ४ जुलै १९१४)
१९९७ : पं. प्रभाशंकर गायकवाड सनईवादक (जन्म:)
२००४ : भारतीय न्यूरोलॉजिस्ट औतार सिंग पेंटल यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९२५)
२००६ : तुर्कमेनिस्तानचे पहिले राष्ट्रपती रूपमूर्त निझाव यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९४०)
२००७ : अमिताभ बच्चन यांच्या आई तेजी बच्चन यांचा जन्म.
२०११ : प्रसिद्ध न्यूक्लियर फिजिसिस्ट पी.के.अयंगर यांचे निधन.

# रुई येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व नागरिकांना ब्लँकेटचे मोफत वाटप

वडवणी। प्रतिनिधी

लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७५ व्या जयंतीनिमित्त रुई (पिंपळा) गावचे उच्चभूषित युवा सरपंच ॲड.मयूर आंधळे यांनी गावातील जि.प.प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गरजू नागरिकांना थंडीपासून बचाव व्हावा म्हणून ब्लँकेटचे मोफत वाटप केले. याबाबत सविस्तर माहिती अशी की,दिवंगत माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त रुई- पिंपळा गावचे उच्चभूषित युवा सरपंच ॲड.मयूर आंधळे यांनी गावामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी गुरुवार दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी गावातील जि.प.प्राथमिक शाळेमध्ये जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या जयंतीच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच ॲड.मयूर आंधळे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पार्टीचे वडवणी तालुकाध्यक्ष सावंत हे होते. मान्यवरांच्या हस्ते लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करून जयंतीच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली जि.प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे व गावातील गरजू नागरिकांना थंडीपासून बचाव होण्यासाठी ब्लँकेटचे मोफत वाटप मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी असणारे वडवणी तालुकाध्यक्ष सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लोकनेते मुंडे साहेब यांच्या कार्याला उजाळा दिला.लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या ७५ व्या जयंतीचे औचित्य साधून रुई- पिंपळा गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे सुशोभीकरण व रंगरंगोटी या कामाचे लोकार्पण व गावातील सार्वजनिक सभामंडपाला लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब नामकरण करण्यात आले त्यानंतर अध्यक्षीय समारोपपर विचार व्यक्त करताना सरपंच ॲड.मयूर आंधळे म्हणाले की,लोकनेते मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी आपण आपल्या गावामध्ये सामाजिक उपक्रम राबवत असतोत लोकनेते मुंडे साहेब यांचाच वसा आणि वारसा घेऊन याही वर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांची जयंती साजरी करत आहोत आपल्या गावचे भूषण असणारे माजी आमदार केशवराव आंधळे व माझे मोठे बंधू संजय भाऊ आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या गावामध्ये हा माझा २६ वा सामाजिक उपक्रम आहे गावातील शाळेतील विद्यार्थी गावचे भविष्य आहे त्यांच्यासाठी काही करता आले याचा मला आनंद आहे असे बोलून लोकनेते मुंडे साहेबांच्या जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. या सामाजिक उपक्रमाचे आयोजन माजी आमदार केशवराव आंधळे, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनकरराव आंधळे,ज्येष्ठ नेते शंकर अण्णा आंधळे,सरपंच संघटनेचे माजी वडवणी तालुकाध्यक्ष संजय भाऊ आंधळे,बीड जिल्हा बँकेचे संचालक अमोल राजे आंधळे आदींच्या मार्गदर्शनाखाली केले होते. लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या सामाजिक उपक्रमासाठी गावातील ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या स्तुत्य उपक्रमाची पंचक्रोशीत चर्चा होत आहे.





## थोडक्यात

### बीड येथे एक दिवसीय निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन

बीड: राज्यामध्ये निर्यात क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी तसेच निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनविण्यासाठी राज्याकडून व केंद्र शासनाकडून जिल्हा निर्यात केंद्र उपक्रमाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. निर्यात प्रचालन कार्यशाळा या प्रमुख मुद्द्यांचा अंतर्भाव असलेली एकदिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळा दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी हॉटेल ग्रँड यशोदा बार्शी रोड बीड येथे सकाळी १०:०० वाजता माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग केंद्र बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे. सदरील कार्यशाळेमध्ये तज्ञ मार्गदर्शक व अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.या कार्यशाळेसाठी सूक्ष्म, लघु, मध्यम, उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नव उद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी, सहकारी संस्था व उत्पादक प्रक्रिया उत्पादक केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य निर्यातीसंबंधी कामकाज करणारे घटक तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्व उद्योग घटकांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे असे आवाहन किरण जाधव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र बीड यांनी केले आहे.

### माजलगावात आर्ष योग संस्थानचे योग शिबिर

माजलगाव : येथील आर्ष योग संस्थानचे वतीने दि.२५ ते ३१ डिसेंबर दरम्यान योग शिबिर व्? शंख प्रक्षालन आयोजन करण्यात आले असून त्यात इच्छुकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.-येथील आर्ष योग संस्थानच्या वतीने योग संबंधित कार्यक्रम घेतली जातात.बुधवार दि.२५ ते मंगळवार ३१ डिसेंबर या कालावधीमध्ये या वर्षातील योग शिबीर येथील वैष्णवी मंगल कार्यालयात घेण्यात येणार आहे.हे मोफत शिबिरआहे. प्रौढासाठी सकाळी साडेपाच ते साडेसात या वेळेत होणार आहे.तर मुलांचे शिबीर सायंकाळी साडेपाच ते साडेसात या वेळेत होणार आहे.रविवार दि.२९ रोजी शंखप्रक्षालन क्रिया सकाळी साडेआठ ते दुपारी एक वाजेपर्यंत राहील .हे शिबीर मधुमेह,उच्च रक्तदाब, वजन व आम्लपित्त असना-यासाठी विशेष उपयोगी आहे.जास्तीत जास्त नागरिकांनी शिबिरात सहभागी व्हावे त्यासाठी नोंदणी ७५८८५९६१९५ या क्रमांकावर करावी असे आवाहन केले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिन

बीड : १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्याक हक्क दिन संपन्न झाला. या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुर्यवंशी , पोलीस उपअधीक्षक यु.म. कपूर, जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी सुधाकर चिंचाणे, अधिकारी कर्मचारी अल्पसंख्याक नागरिक उपस्थित होते. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी सुधाकर चिंचाणे यांनी प्रस्ताविकात अल्पसंख्याक समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली. उपस्थित असलेल्या नागरिकांनी अल्पसंख्याकांबाबत विविध सूचना करुन श्री. स्वामी यांना मागण्यांचे लेखी निवेदन सादर केले. श्री. चिंचाणे यांनी सुत्र संचलन व आभार प्रदर्शन केले.

### व्यवसायिक अभ्यासक्रम ऑनलाईन अर्थसहाय्याबाबत

बीड : सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड कार्यालय मार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता ११ वी व त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वस्तीगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांना घरभाडे व इतर खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षापासून सदर योजना ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत असून त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी ://.. या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. सदर योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत दि. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह ऑनलाइन पद्धतीने विहिध मुदतीत अर्ज करण्याच्या आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.

# माजलगाव उपविभागातील दक्षता कमिटीची दुसरी बैठक

## ॲट्रॉसिटी ॲक्ट संबंधी विषयावर चर्चा

माजलगाव। प्रतिनिधी

माजलगाव,धारूर,वडवणी या उपविभागामध्ये कार्यान्वित झालेली उपविभागीय दक्षता कमिटीची बैठक उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली.

याबाबत अधिक वृत्त असे की माजलगाव,धारूर,वडवणी या तीन तालुक्याची मिळून एकत्रित असलेली उपविभागीय दक्षता कमिटीची दुसरी बैठक माजलगाव येथे उपविभागीय कार्यालयात उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली व कमिटीचे अशासकीय सदस्य ॲड.दशरथ मकसरे, संपादक अनिल वाघमारे, आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे त्याचबरोबर प्रशासनातील गटविकास अधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव श्रीमती मुळीक मॅडम, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, सहायक गटविकास अधिकारी एस.एल.कांदे, पोलीस उपनिरीक्षक एम.आय.शहा, पोलिस सब इन्स्पेक्टर यु.व्ही.चव्हाण,पंचायत समितीचे आर.एल.देशमुख यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीत वडवणी,माजलगाव, धारूर तालुक्यातील ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार नोंद झालेल्या गुन्ह्यांची संपूर्ण माहिती घेणे, अर्थसहाय्य नोंदी, गत सहा महिन्यांत १६ गुन्हे व २३ नोंदीचा जुन २०२४ नंतरचा संपूर्ण डाटा उपलब्ध करून घेण्याची खबरदारी सह आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी पुढील बैठकीत सर्व अपडेट प्रशासनातील अधिकाऱ्यांनी मांडाव्यात अशा सुचना देत आगामी काळात आपण या संबंधी कार्यशाळा आयोजित करु असे देखील बैठकीत सांगितले. अशासकीय सदस्य संपादक अनिल वाघमारे, राजेश घोडे,ॲड.दशरथ मकसरे यांनीही बैठकीत काही विषय मांडले. शेवटी समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या सुचनेनुसार सदर बैठकीची सांगता करण्यात आली.

# बीड येथे एकदिवसीय निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन

बीड। प्रतिनिधी

राज्यामध्ये निर्यात क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी तसेच निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनविण्यासाठी राज्याकडून व केंद्र शासनाकडून जिल्हा निर्यात केंद्र उपक्रमाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. निर्यात प्रचालन कार्यशाळा या प्रमुख मुद्द्यांचा अंतर्भाव असलेली एकदिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळा दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी हॉटेल ग्रँड यशोदा बार्शी रोड बीड येथे सकाळी १०:०० वाजता माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग केंद्र बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे.

सदरील कार्यशाळेमध्ये तज्ञ मार्गदर्शक व अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.या कार्यशाळेसाठी सूक्ष्म, लघु, मध्यम, उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नव उद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी, सहकारी संस्था व उत्पादक प्रक्रिया उत्पादक केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य निर्यातीसंबंधी कामकाज करणारे घटक तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात येणार आहे.

बीड जिल्ह्यातील सर्व उद्योग घटकांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे असे आवाहन किरण जाधव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र बीड यांनी केले आहे

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल असंविधानिक वक्तव्याचा निषेध

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवार रोजी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात राज्यसभेत '' डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेण्याची फॅशन झाली आहे.आंबेडकरांच्या ऐवजी देवाचे नाव घेतले असते तर सात जन्म स्वर्गात जागा मिळाली असती'' अशा प्रकारे असंविधानिक वक्तव्य करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला असुन यामुळे महमानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुयायांच्या भावना दुखावल्या असुन याचा निषेध करण्यासाठी आज दि.१९ गुरुवार रोजी लिंबागणेश येथील आंबेडकर समर्थकांनी डॉ . बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा हातात घेऊन गावातुन फेरी काढत '' डॉ . बाबासाहेब आंबेडकर फॅशन नाही तर पशन आहे. अमित शहा माफी मागा'' ''अमित शहा राजीनामा द्या'' '' देश संविधानसे चलेगा '' एकच साहेब बाबासाहेब''घोषणा दिल्या. यावेळी डॉ . गणेश ढवळे,उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ,दामु आण्णा थोरात, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, माजी उपसरपंच शंकर वाणी, भीम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ,आल इंडिया पँथर सेना उपजिल्हाध्यक्ष बीड आरूण निर्मळ, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेश निर्मळ, विक्रांत वाणी, अँड.गणेश वाणी, लहु थोरात,रिंकु निर्मळ, विलास काटे, नामदेव अवसरे, चोखोबा निर्मळ, साहेबराव थोरात,पप्पू निर्मळ, नितीन थोरात, राजेंद्र थोरात,गणेश थोरात, माणिक थोरात, नितीन थोरात, प्रकाश निर्मळ, अमोल वक्ते, स्वप्निल वक्ते,राज निर्मळ,शहाजी वाणी,शंभु वाणी, रामदास निर्मळ, राजेंद्र निर्मळ,सोनु थोरात, नितेश निर्मळ, मल्हारी थोरात,कचरू निर्मळ,संदिप निर्मळ, स्वप्निल निर्मळ, स्वराज्य निर्मळ,बबन सोनावणे, बालाजी निर्मळ आदी उपस्थित होते.



# अल्पसंख्याक समितीवर अशासकीय सदस्य नोंदणीसाठी अर्जाचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्यांकांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला असून जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीवर शासकीय अधिकारी त्या त्या जिल्ह्याचे राज्यसभा, लोकसभा तसेच विधानसभा सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासह अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या ३ नामवंत संस्थाचे अशासकीय प्रतिनिधी समितीवर सदस्य असणार आहेत.

अल्पसंख्यांकासाठी काम करणाऱ्या ३ नामवंत स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी यांचे नामनिर्देशन शासनास सादर करण्याकरिता शासन निर्णयानुसार व १५. ४. २०१७ मध्ये दिलेल्या दिशानिर्देशानुसार अनुसरून इच्छुकांनी अर्ज प्रस्ताव दिनांक २६ डिसेंबर २०२४ पर्यंत विहित नमुन्यात सादर करण्याचे आवाहन, जिल्हा नियोजन कार्यालय बीडतर्फे करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवाराकडून सादर करण्यात येणाऱ्या अर्ज प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. नाव, पत्ता, जन्म दिनांक, व्यवसाय, शिक्षण, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी .

अल्पसंख्यांकांसाठी काम करणा-या नामवंत समाजसेवी संस्थाचे प्रतिनिधी असल्याचे प्रमाणपत्र.( संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा स्वाक्षरीने अधिकृत) अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी करण्यात आलेल्या सामाजिक कार्याची माहिती. जिल्हास्तरावर अल्पसख्यांक कल्याण समितीवर निवड झालेल्या प्रतिनिधींना, सदस्यांना कोणतेही मानधन व बैठक भत्ता देय होणार नसल्याचे जिल्हा नियोजन अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकात नमूद केले आहे.

# नूतन माध्यमिक विद्यालयाचे विज्ञान प्रदर्शनात यश

धारूर। प्रतिनिधी

धारूर येथे झालेल्या तालूकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात नुतन माध्यमीक विद्यालयाचा माध्यमीक गटात दुसरा तर माध्यमीक शिक्षक गटात प्रथम क्रमाक मिळून जिल्हास्तरीय सविज्ञान प्रदर्शना साठी निवड झाल्याने या दुहेरी यशा बद्दल सर्वत्र कौतूक होत आहे.

नूतन माध्यमिक विद्यालय अंजनडोह तालुका धारूर या शाळेतील विद्यार्थिनीचा धारूर येथील जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालयात झालेल्या ५२व्या विज्ञान प्रदर्शनात ,कुमारी सोफिया पाशा व प्रांजली नेताजी सोळंके या विद्यार्थिनीचा 'माती विना हरित शेती' या प्रयोगाचा माध्यमीक गटात दुसरा क्रमांक आला. तर शिक्षक गटात श्रीमती. प्रतिभा रामराजे राऊत यांचा प्रथम क्रमांक आला. या दोन्ही प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाला निवड झाल्याने या यशाबद्दल या शिक्षीका व विद्यार्थिनी यांचे पालकांकडून, विद्यार्थ्यांकडून, संस्थेकडून, शाळेकडून ,कौतुक करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव .सुंदरराव आदमाने . अध्यक्ष ज्ञानेश्वर रामराव ठोंबरे ,मुख्याध्यापक .एन.पी देशमुख व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते



# लक्की फ्यूल स्टेशनमुळे ग्रामिण भागातील वाहनचालकांची सोय - बाबुराव पोटभरे

## मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील ग्रामीण भागातील व विशेषतः खेड्यापाड्यातील वाहन चालकांना आपल्या वाहनांमध्ये इंधन टाकण्यासाठी शहराच्या ठिकाणी यावे लागते. परिणामी त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही व्यर्थ वाया जातो. मात्र वडवणी शहरापासून ढोरवाडी शिवारामध्ये उजगरे परिवाराने सुरु केलेल्या या हिंदुस्तान पेट्रोलियमच्या लक्की फ्यूल स्टेशनमुळे या गावच्या परिसरातील जवळपास पाच ते सहा गावातील व या राज्य महामार्गावरील वाटसरु वाहन चालकांना इंधनाची चांगली सोय निर्माण झाली असून या ठिकाणी असलेल्या शुध्दता व प्रामाणिकता यामुळे परिसरातील वाहन चालकांमध्ये निश्चितपणे समाधान निर्माण झालेले आहे. पूर्वी अतिशय बिकट परिस्थितीतून वडवणीतील या उजगरे परिवाराने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मूलमंत्र दिलेल्या शिक्षणाची कास धरुन प्रगतीकडे उंच गरुडझेप घेतली आहे. यामुळे या परिवाराचा आपणांस नेहमीच अभिमान वाटतो असे मनोगत बहूजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी व्यक्त केले.



वडवणी शहरापासून अगदी जवळच असलेल्या २३२ पिंपळनेर-ढोरवाडी-वडवणी या राज्य महामार्गावर ढोरवाडी शिवारामध्ये हिंदुस्तान पेट्रोलियमचे लक्की फ्यूल स्टेशन याची उभारणी वडवणी येथील उजगरे परिवारातील स्नूषा सौ.नूतन बाबासाहेब उजगरे यांनी केली आहे. याचा शुभारंभ दिनांक १५ डिसेंबर २०२४ रविवार रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी उदघाटक म्हणून बीड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भगवान फुलारी यांची उपस्थिती लाभली. तर विशेष उपस्थिती म्हणून एचपी बीडचे सेल्स ऑफिसर प्रथमेश सोलापूरे त्याचबरोबर उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, उपशिक्षणाधिकारी भगवानराव सोनवणे, उपशिक्षणाधिकारी रंगनाथ राऊत, उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, शिरुरचे गटशिक्षणाधिकारी शेख जमीर, सहाय्यक निबंधक बाबासाहेब गायकवाड, उपकार्यकारी अभियंता शशिकांत गायकवाड, नवोदय विद्यालय उपप्राचार्य सूर्यकांत गायकवाड यांची उपस्थिती लाभली. तर मुख्य अतिथी म्हणून बहूजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, माजी आमदार केशवराव आंधळे, नगराध्यक्ष शेषेराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, ज्येष्ठ नेते सोमनाथराव बडे, नगरसेवक सुधीर ढोले, माजी नगरसेवक महादेव जमाले, काँग्रेसचे नेते दादासाहेब मुंडे, वैद्यकीय तज्ञ डॉ.शंकर वाघ, राष्ट्रवादीचे नेते डॉ.प्रकाश जेधे, माजी सभापती दिनकरराव आंधळे, ज्येष्ठ नेते बाबुशेठ नहार, माजी जिल्हा परिषद सदस्य सर्जेराव आळणे, माजी गटशिक्षणाधिकारी गौतम चोपडे, सरपंच महेश शिंदे, सरपंच बाबासाहेब कवचट, सरपंच आत्माराम माने, सरपंच सोमनाथ वडमारे, सरपंच उत्तरेश्वर खताळ, युवा नेते बजरंग गायकवाड, संपादक अनिल वाघमारे, पत्रकार सुधाकर पोटभरे, पत्रकार अविनाश मुजमुले, पत्रकार अर्जुन मुंडे, माजी उपसरपंच पंडित उजगरे, विधिज्ञ ऍड.श्रीराम लंगे, विधिज्ञ ऍड.भास्कर उजगरे, उद्योजक संतोष डावकर, माजी सरपंच राजू वाघमारे, युवा नेते अमरसिंह मस्के, युवा नेते श्रीराम मुंडे, युवा नेते सुग्रीव मुंडे यांसह सर्वपक्षीय मान्यवर, विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तिमत्व, वडवणी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, शिक्षक बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार उजगरे परिवाराच्या वतीने लक्की फ्यूल स्टेशनच्या संचालिका सौ.नूतन बाबासाहेब उजगरे यांच्यासह अर्जूनराव उजगरे, नगरसेवक भिमराव उजगरे, गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विक्की शिंदे, शुभम उजगरे, रमेश झोंबाडे, दादासाहेब शिंदे, जालिंदर थोरात यांनी परिश्रम घेतले.

cmyk
राज्य लोकतंत्र
शुक्रवार, दि.२० डिसेंबर २०२४ | ६

# सिंदफणा पाणीदार करून गेवराई तालुका दुष्काळमुक्त करावा

## आ.विजयसिंह पंडित यांची विधानसभेत मागणी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुका गोदावरी आणि सिंदफणा नदीच्या कुशीत वसला असला तरी तो सिंचनापासून दुर्लक्षित आहे. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून गोदावरी नदीपात्रात झालेल्या बॅरेजच्या श्रृंखलेमुळे गोदाकाठ ओलिताखाली आला असला तरी सिंदफणा नदीचा काठ मात्र दुष्काळग्रस्त राहिला आहे. यासाठी टाकळगाव को.प.बंधाऱ्याचे निम्न पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्याच्या कामास तात्काळ प्रशासकीय मान्यता द्यावी आणि इतर बॅरेजेसच्या कामाचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले असल्यामुळे त्यासही मान्यता देण्याची कार्यवाही करून सिंदफणा नदी पाणीदार करून गेवराई तालुका दुष्काळमुक्त करावा अशी मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे विधानसभेत केली.



सिंदफणा नदी पाणीदार करण्याच्या ड्रीम प्रोजेक्टची संकल्पना जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी सातत्याने मांडली, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान त्यांनी मतदारांना याबाबतचे आश्वासन दिले होते. आ.विजयसिंह पंडित यांच्या जाहिरनाम्यातही त्याचा उल्लेख आहे. मतदारांना दिलेल्या आश्वासनाची पुर्ती करण्यासाठी आ.विजयसिंह पंडित यांनी हा विषय औचित्याच्या मुद्याद्वारे विधानसभेत उपस्थित केला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, टाकळगाव-हिंगणी को.प.बंधाऱ्याचे निम्न पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्याच्या कामास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने मान्यता दिली असून त्यास बाब क्र.१४० नुसार अर्थसंकल्पीय निधीची तरतुद करण्यात आली आहे. केवळ मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर हा प्रस्ताव ठेवून त्यास मान्यता देणे बाकी आहे. त्यामुळे या प्रस्तावास तात्काळ प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी आ.पंडित यांनी केली.

पुढे बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, सिंदफणा नदीवरील ईटकुर, अंकुटा, खुंड्रस, कुक्कडगाव, नाथापूर आणि बिंदुसरा नदीपात्रातील नामलगाव या को.प.बंधाऱ्याचे निम्न पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्याच्या कामाचे सर्व्हेक्षण आणि अन्वेषणाचे काम पूर्ण झालेले आहे, त्याचाही प्रस्ताव शासनाने मागून घेवून त्यास प्रशासकीय मान्यता देण्याची त्यांनी मागणी केली. सिंदफणा नदीकाठच्या गावातील पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि कायमस्वरुपी दुष्काळाचे निर्मुलन करण्यासाठी बॅरेजची आवश्यकता असल्याची बाब त्यांनी यावेळी अधोरेखित केली. या बॅरेजमुळे गेवराई विधानसभा मतदार संघातील ३५ हजार एकर जमीन ओलिताखाली येणार असल्याचे आ.पंडित यांनी सांगितले. विधानसभा निवडणुकीतील प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनाची पुर्ती करण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी समाज माध्यमातून सांगितले आहे.



लोकनेत्या तथा महाराष्ट्र राज्याच्या नर्वनिर्वाचित कॅबिनेट मंत्री आदरणीय ना. पंकजाताई मुंडे यांची विधानभवन नागपूर येथे रुई,पिंपळा गावचे सरपंच मयूर आंधळे व युवा नेते महादेव सावंत यांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या !

# रोटरी क्लब व भिमसेन लोमटे मित्र मंडळाच्या वतीने १०१ जणांचे रक्तदान



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व सामाजिक कार्यकर्ते भिमसेन दाजीसाहेब लोमटे मित्रमंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १०१ रक्तदात्यानी रक्तदान करून युवा नेते भिमसेन लोमटे यांचा वाढदिवस साजरा केला.

येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व भिमसेन आप्पा लोमटे मित्रमंडळ यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी उपनगराध्यक्ष बबन लोमटे,सामाजिक कार्यकर्ते दाजीसाहेब लोमटे,रोटरी क्लबचे अध्यक्ष ◀◀ पान ३ वर



माजलगाव:– महाराष्ट्र राज्याच्या कॉबीनेट मंत्री म्हणून मा.ना.संजय राठोड यांनी निवड झाल्याबद्दल नागपूर येथे त्यांची भेट घेऊन सत्कार करुन शुभेच्छा देताना बीड जिल्हा बंजारा समाजाचे नेते रमेश पवार

# तर बोगस गुंठेवारीधारकांवर होणार गुन्हे दाखल

## वडवणीत बोगस गुंठेवारी बनवुन देण्याच रॅकेट ? अनेक गुंठेवारी बोगस असण्याची शक्यता

वडवणी । अर्जुन मुंडे

वडवणी शहरात मागिल काही दिवसांपासुन प्लॉटच्या बोगस गुंठेवारीची प्रकरण होत आसुन गेल्या कित्येक वर्षांपासून प्लॉट विक्रीचा व्यवसाय तेजीत असुन यामधुनबोगस गुंठेवारीच्या माध्येमातुन कित्येक नागरिकांची फसवणुक होत असल्याचे आता उघड होत आहे. याबाबत आसे बोगस गुंठेवारीचे प्रकरण आढळुन आल्यास त्याची पडताळणी करुन त्या बोगस गुंठेवारीधारकांवर नियमानुसार गुन्तुहे दाखल करण्यात येणार असल्याचे वडवणी न.प. मुख्याधिकारी श्री पि. एन . निखळ यांनी सांगितले.

### बोगस गुंठेवारी आढळून आल्यास गुन्हा दाखल करणार -पी.एन.निगळ

शासननिर्णयानुसार जर एक दोन गुंठे जमिनीचे भुखंड किंवा प्लॉटची खरेदी विक्री करायची आसेल तर त्यासाठी एन ले-आऊट किंवा गुंठेवारी करणे आवश्यक असते परंतु यासाठी बराच वेळ व पैसा खर्च करावा लागत आसल्याने वडवणीत मात्र शासनाच्या या गुंठेवारी नियमाला हरताळ फासला जात असुन राजरोसपणे गुंठेवारीची कोणतीही प्रक्रिया न करता किंवा त्या साठीची कसलिही संचीका नगरपंचायत कडे दाखल न करताच बनावट सही शिक्के वापरुन बोगस गुंठेवारीचे प्रमाणपत्र बनवुन देणारे रॅकेटच सक्रीय झालेले असुन त्या बोगस गुंठेवारीवरुनच राजरोसपणे वडवणीच्या दुय्यम निबंधक कार्यालयाकडुन प्लॉटच्या दस्तनोंदण्या होत असल्याचे पहायास मिळत आहे . यामध्ये नगरपंचायत, निबंधक कार्यालयातील एजन्ट यांच्या संगनमताने हा सर्व प्रकार ◀◀ पान ३ वर

# देशमुख खून प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड व त्याचे साथीदारांवर मोक्का अंतर्गत कारवाई करा -फोलाने

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मस्साजोगचे मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड व त्याचे साथीदारांवर मोक्का अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून केले आहे. याप्रकरणी तातडीने दखल घेऊन योग्य त्या उपाययोजना



करा अशी अपेक्षा निवेदनात व्यक्त केली आहे.

राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी मुख्यमंत्र्यांना बुधवार, दिनांक १८ डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मस्साजोग (ता.केज,जि.बीड) येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निघृण खून प्रकरणाला आज आठ दिवस झाले आहेत. या घटनेने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात खळबळ उडवली आहे. प्रकरणाच्या गांभिर्यामुळे राज्यातील विधिमंडळ ◀◀ पान ३ वर

# स्टुडन्ट रिलीफ सोसायटीच्या विरोधात प्रवीण प्रशिक्षक संघटनाही उतरली

## प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील प्रवीण प्रशिक्षकांची निवड करण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

राजस्थानच्या स्टुडन्ट रिलीफ सोसायटी जयपूरच्या विरोधात आता महाराष्ट्र राज्य प्रवीण प्रशिक्षण संघटनाही उतरली असून या संघटनेने जलजीवन मिशनचे प्रशिक्षण स्थानिक प्रवीण प्रशिक्षकांना द्यावे अशी मागणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.



या संदर्भात स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात महाराष्ट्र राज्य प्रवीण प्रशिक्षक संघटनेने म्हटले आहे की सध्या जलजीवन मिशनचे प्रशिक्षण चालू आहे. परंतु प्रशिक्षणामध्ये स्थानिकचे प्रवीण प्रशिक्षकच नाहीत. यापूर्वी स्थानिक प्रवीण प्रशिक्षका मार्फत प्रशिक्षण दिले होते. मात्र यावर्षी बाहेरील प्रशिक्षक बोलावून स्थानिक च्या प्रवीण प्रशिक्षकावर अन्याय केलेला आहे. शासन निर्णयामध्ये स्थानिक च्या प्रशिक्षकांना प्राधान्य देण्याचे नमूद केले असून स्टुडन्ट सोसायटी ही संस्था मनमानी करत आहे. या संदर्भात शासनाच्या नियमाप्रमाणे प्रशिक्षण हे स्थानिक प्रशिक्षकाकडूनच देणे आवश्यक आहे. त्यांची बोलीभाषा स्थानिकची ◀◀ पान ३ वर

# परभणी आणि मस्साजोग प्रकरणी पाटोदा (म.) येथे रास्ता रोको आंदोलन

## पोलिसांना सहआरोपी करून दोन्ही प्रकरणाची सीबीआय मार्फत सखोल चौकशी करावी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परभणी आणि मस्साजोग प्रकरणातील आरोपींसोबत पोलिसांना सहआरोपी करा, तसेच ३०२ चा गुन्हा दाखल करून दोन्ही प्रकरणाची सीबीआय मार्फत सखोल चौकशी करावी यासाठी भिमशक्ती व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तालुक्यातील मौजे पाटोदा (म.) येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व अंबाजोगाई ग्रामीण ठाण्याचे पोलिस निरीक्षक



यांना निवेदन देण्यात आले. परभणी आणि मस्साजोग प्रकरणी मौजे पाटोदा (म.) येथे मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर रोजी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आम्ही भिमशक्ती सामाजिक संघटना व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आपणांस निवेदन देत आहोत की. परभणी येथे भारतीय संविधानाची विटंबना करून तोडफोड केली. या प्रकरणात पोलीस यंत्रणेकडून प्रचंड दहशत निर्माण केली. अनेकांना अटक करून त्यामध्ये सोमनाथ व्यंकटराव सुर्यवंशी यांचा बळी घेतलेला आहे. शासकीय प्रशासकीय अधिकाऱ्यांनी परभणीत झालेल्या घटनेत गांभीर्याने प्रसारीत झालेले व्हिडीओ पहाव्यात. पोलीस अधिकारी गाड्या फोडत आहेत. तसेच पोलिसाच्या वेशामध्ये अनेक गुंड कार्यकर्त्यावर लाठीचार्ज करीत आहेत. परभणी रेल्वे स्टेशन येथील सेवकसिंग नांवाचा गुंड काठी ◀◀ पान ३ वर

# सेवानंद महिला ग्रुपच्या वतीने छत्रपती शिवाजी विद्यालयाला ड्युअल डेस्क भेट



माजलगाव । प्रतिनिधी

येथील सेवानंद महिला ग्रुप व प्रा. संगीता जाधव यांच्या संयुक्त विद्यमाने कै. निळकंठ जाधव यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त छत्रपती शिवाजी विद्यालयाला ३० ड्युअल डेस्क भेट देण्यात आले.

या निमित्त छत्रपती शिवाजी विद्यालयात मंगळवार दि.१७ डिसेंबर रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उज्वला होके पाटील या होत्या. यावेळी अंजली सोळंके,प्रा.स्नेहल पाठक, शोभा वर्मा, प्रा.संगीता जाधव, जान्हवी जाधव, सुनीता शेजुळ, जयश्री लड्डा यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरुवातीला कै. निळकंठ जाधव यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयश्री लड्डा यांनी केले. यामध्ये त्यांनी सेवानंद महिला ग्रुपच्या वतीने आत्तापर्यंत विविध शाळांना दिलेल्या मदतीची माहिती दिली व कै. निळकंठ जाधव यांच्या आठवणींना उजाळा दिला . यावेळी ◀◀ पान ३ वर

# माजी आ.भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी कार्यकर्त्यांची चिंतन बैठक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील कार्यकर्त्यांची चिंतन बैठक शनिवार दि.२१ डिसेंबर रोजी आष्टी येथे होणार आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की,आष्टी विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले होते. शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांनी निवडणूकी पुर्वी प्रत्येक गांव,वाड्या, वस्त्यांवर जाऊन संपुर्ण मतदारसंघ पिंजून काढला.लोकाग्रहास्तव त्यांनी अपक्ष उमेदवारी दाखल करीत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला.सर्व ताकदीनिशी निवडणूक लढविली. कार्यकर्त्यांनी देखील जिवाचे रान करीत जिंकण्यासाठी प्रयत्न केले परंतु अपयश आले. आपला पराभव कसा झाला. आपण ◀◀ पान ३ वर

# लक्ष्मण आण्णांनी विधानसभा निवडणुकीत संजयनगर वासियांना दिलेला शब्द पाळला

## संजयनगर येथील रहिवाशांकडून लक्ष्मण आण्णांचे मानले आभार

गेवराई । प्रतिनिधी

शहरातील संजयनगर येथे काही भागात लाईटच्या पोलची आवश्यकता होती संजयनगर येथील भिल्ल वस्तीच्या बाजुला असलेल्या भागात पोल नसल्याने त्या नागरिकांना खुप मोठ्या अंतरावरुन लाईट घ्यावी लागत असे त्यामुळे नागरिकांची गेल्या काही वर्षांपासून गैरसोय होत असे तेथील नागरिक पोल मिळावे म्हणून सातत्याने मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्याकडे पाठपुरावा करीत होते जनतेच्या मागणीची दखल घेत



मा.आ.लक्ष्मण आण्णांनी विज वितरण कार्यालयाकडे पाठपुरावा करुन संजयनगर येथील विद्युत पोलचा प्रश्न मार्गी लावा अशा सुचना केली होती त्यानंतर विज वितरण कार्यालयाने तेथील रहिवाशांकडून मिटर घेण्यासाठी कोटेशन भरून घेतले होते तरी सुध्दा वेगवेगळे कारणे विज वितरण कार्यालय टाळाटाळ करत होते विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचरा दरम्यान लक्ष्मण आण्णांनी निवडणुकी नंतर ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# कोट्यवधी रुपयांचा गंडा घालणारी गुढीया अखेर पुणे पोलिसांच्या जाळ्यात

## वर्षभर शोध अन् असा रचला सापळा

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात नामांकित व्यावसायिकला तब्बल ४ कोटी रुपयांचा गंडा घालणारी रिलस्टार गुढीया उर्फ सानिया सिद्धकीला पुणे पोलिसांनी बिहारमध्ये जाऊन अटक केली आहे. फसवणुकीच्या गुन्ह्यात फेब्रुवारीमध्ये अटक केलेली सानिया पुणे पोलिसांच्या हातावर तुरी देत पळून गेली होती. एका बाजूला सोशल मीडियावर रिल बनवणारी ही सानिया सायबर चोर आहे. बिहारच्या राहणारी सानियाने अनेक लोकांना सायबर चोरीचा सापळा रचून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली आहे. फेब्रुवारी महिन्यात पुण्यातील एका नामांकित बिल्डरला सुद्धा चार कोटी रुपयांचा गंडा घातला होता, त्यावेळी पुणे पोलिसांनी तिला परराज्यातून पकडले होते. मात्र, रेल्वेच्या प्रवासादरम्यान ती पोलिसांच्या तावडीतून पळून गेली. या घटनेनंतर पुणे



पोलिसांच्या ६ जणांना निलंबित करण्यात आलं होतं. १० महिन्यांपासून पुणे पोलिसांच्या सायबर विभागाच्या रडारवर असलेली गुढीया अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकली आहे.

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, पुणे शहरातील बड्या नामवंत बांधकाम कंपनीचा व्यवसायिकाला तब्बल चार कोटींचा गंडा घातला आहे. हा सर्व प्रकार २५ जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०२४ दरम्यान घडला होता. पुणे पोलीस या महिलेला तेव्हापासून वर्षभर शोधत होते. तिला अखेर पकडण्यात यश आलं आहे. फसवणुकीच्या गुन्ह्यात फेब्रुवारी महिन्यातच रिलस्टार गुढीया उर्फ सानिया सिद्धकीला फरीदाबाद येथून ताब्यात घेतले, मात्र पुण्याला तिला आणत असताना कोटा रेल्वे स्टेशनवर ती पळून गेली. पुणे पोलीस पुन्हा तिच्या मागावर होते. सायबर पोलिसांनी केलेल्या तपासानंतर एक पोलीस पथक दिल्ली पोलिसांच्या मदतीने दिल्लीच्या जामिया नगर भागात माहिती काढून बिहारमधील सिवान येथे जाऊन सानिया ही गोपालगंज भागात असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पुण्यातील हे पथक गोपालगंज येथे पोहोचले.

सानिया राहत असलेले ठिकाण पोलिसांनी शोधून काढले. ज्यावेळी पोलीस तिथे पोहोचले. त्यावेळी ती घरात नव्हती. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने वेशांतर करून एका शेतात मुक्काम केला.ती घरी आली तेव्हा पोलिसांनी तिच्यावर छापा टाकला. तेव्हा देखील ती पळून जाण्याची तयारीत होती. मात्र अखेर पुणे पोलिसांनी तिला पकडले. सोशल मीडियावर रिल बनवणारी ही सानिया सायबर चोर आहे. बिहारच्या राहणारी सानियाने अनेक लोकांना सायबर चोरीचा सापळा रचून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली आहे.

# प्रशिक्षणार्थी वैमानिकाच्या अवयवदानामुळे ६ जणांना जीवनदान

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे येथे पायलटचे प्रशिक्षण घेणाऱ्या व मूळच्या राजस्थानमधील २१ वर्षीय प्रशिक्षणार्थी पायलट तरुणी रस्ता अपघातात गंभीर जखमी झाली होती. तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना ती ब्रेन डेड झाली. मात्र कुटुंबीयांनी केलेल्या अवयावदनाने ६ जणांना अवयव मिळाले.

तिचा बारामतीहून भिगवण ला चारचाकीतून जात असताना ९ डिसेंबर रोजी अपघात झाला होता. तिच्या सोबत असणाऱ्या दोन तरुणांचा मृत्यू झाला होता तर या तरुणीला गंभीर जखमी अवस्थेत रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. उपचारादरम्यान तिला डॉक्टरांनी ब्रेन डेड घोषित केले. या प्रशिक्षणार्थी पायलट तरुणीचे आई–वडील राजस्थानमधील जोधपूरमध्ये राहतात. ते पुण्यात आले होते. आई–वडील आणि भावाने समुपदेशनानंतर अवयवदानासाठी बुधवारी (ता. १८) ला संमती दिली. प्रादेशिक अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीच्या समन्वयक आरती गोखले यांनी दिली.

एक यकृत दोन रुग्णावर प्रत्यारोपित



अवयवदात्या तरुणीचे पाच अवयव एक किडनी, यकृत, हृदय रुबी हॉल येथे आणि दुसरी एक किडनी व स्वादुपिंड डी.वाय.पाटील रुग्णालयातील रुग्णांवर प्रत्यारोपित करण्यात आले. विशेष म्हणजे यकृताचे दोन तुकडे केल्याने ते दोन स्वतंत्र रुग्णांवर प्रत्यारोपित करण्यात आल्याने ५ अवयावद्वारे सहा जणांना जीवनदान मिळाले.

## गंधर्व महोत्सवासाठी महामेट्रोची विशेष सुविधा

**पुणे | प्रतिनिधी**

सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवासाठी येणाऱ्या रसिकांसाठी महामेट्रोतर्फे विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अंतर्गत महोत्सवाच्या कालावधीमध्ये मेट्रो रात्री ११:०० वाजेपर्यंत प्रवाशांच्या सेवेमध्ये असेल. तसेच, शनिवारी रात्री १२:०० वाजेपर्यंत मेट्रोची सुविधा उपलब्ध असेल. याशिवाय स्वारगेट मेट्रो स्टेशन ते सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाचे ठिकाण म्हणजे मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाचे क्रीडासंकुल यामध्ये शटल बस सर्व्हिस मेट्रो तर्फे उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रत्येक २० मिनिटानंतर ही शटल बसफेरी असणार आहे आणि याचे तिकीट फक्त रुपये १० असणार आहे.

## नववीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा हृदयविकाराने मृत्यू

**राजगुरूनगर | प्रतिनिधी**

राजगुरूनगर येथील महात्मा गांधी विद्यालयात इयत्ता नववीत शिकणाऱ्या मुलीचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि १८ ) घडली. स्नेहा एकनाथ होले (वय १५, रा. होलेवाडी, ता. खेड) असे मृत्यू झालेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे.



स्नेहा होले ही राजगुरुनगर येथील महात्मा गांधी विद्यालयात इयत्ता नववीत शिकत होती. सकाळी ती नेहमीप्रमाणे शाळेत आली होती. शाळेत स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यान कार्यक्रमात बसली होती. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास तिला अस्वस्थ वाटून चक्कर आली. शिक्षकांनी तात्काळ तिला खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच स्नेहाचा मृत्यू झाला. स्नेहाच्या पाठीमागे एक भाऊ, आई , वडील असा परिवार आहे. या घटनेने होलेवाडीत व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## पिंपरी शहरात पशू गणना सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाकडील पशू संवर्धन आणि



दुग्ध व्यवसाय विभागामार्फत २५ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत २१ वी पशू गणना करण्यात येत आहे.

शासनाच्या विविध विकासाचे नियोजन, धोरणात्मक निर्णय घेणेकामी तसेच दुध, अंडी व मांस या प्रमुख पशुजन्य पदार्थाच्या उत्पादनाची आकडेवारी तयार करणेसाठी पशू गणना महत्वाची आहे.

पिंपरी–चिंचवड महापालिका हद्दीतील घरगुती, संस्था व गोशाळा पशू मालकांकडे असलेल्या १६ प्रजातीपैकी (गाय वर्गीय, म्हैस वर्गीय सह पशूंसह, मिथून, मेंढी, शेळी, डुक्कर, घोडा, शिंगरु, खेचर, गाढव, उंट, कुत्रा, ससा, हत्ती) व कुक्कट पशी (कोंबडे–कोंबड्या, बदक, टर्की आणि इमू, क्वेल, गिनी, शहामृग) यांची जाती निहाय, वयोगट. तसेच लिंगनिहाय व उपयोगानुसार ५० प्रगणकाकडे माहिती देऊन सहकार्य करणेबाबत महापालिके मार्फत पशू पालकास आवाहन करण्यात येत आहे. पशू गणनेचे कामकाज मे. ॲनिमल हेल्थ ऑर्गनायझेशन या संस्थेमार्फत सुरु आहे.

## ‘सारथी’कडून विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन

पुणे : छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्यामार्फत मराठा, कुणबी, मराठा–कुणबी व कुणबी–मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी दिली.

मराठा आणि कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना या परीक्षेच्या अभ्यासाकरिता प्रोत्साहन मिळावे, यासाठी सारथी संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना ११ महिने कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे, तर त्यासाठी प्रशिक्षणार्थींना दरमहा दहा हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे. तसेच, प्रशिक्षणाचे संपूर्ण शुल्क सारथी संस्थेमार्फत देण्यासंदर्भात संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या न्यायिक सेवा परीक्षेमार्फत दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांची निवड केली जाते. त्यातील काही दंडाधिकाऱ्यांना कालांतराने उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून बढती मिळते.


**येथे दिले जाणार प्रशिक्षण...**

११४ विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाचा लाभ दिला जाणार आहे. प्रशिक्षण पुण्यात मराठवाडा मित्रमंडळ शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, नाशिकमध्ये स्पेक्ट्रम अकादमी आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये संकल्प एज्युकेशन या प्रशिक्षण वर्गामार्फत राबविले जाणार आहे.

# यात्रेत गाणे वाजवण्यावरून हाणामारी; खेडमधील विर्हाम येथील घटना

खेड । प्रतिनिधी

यात्रेत आयोजित करमणुकीच्या कार्यक्रमात एका भीम गीताला गावातील जातीयवादी विचारसरणीच्या लोकांनी विरोध केला, मात्र हे गाणे झाले पाहिजे, असा आग्रह धरणार्या एका पाहुण्यासह त्याची पत्नी आणि बहीण यांना जातीवाचक शिवीगाळ करून बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना विर्हाम (ता. खेड) येथे सोमवारी (दि. १६) घडली. यावरून एका अल्पवयीन मुलासाह सात जण आणि ४ अनोळखी अशा ११ जणांविरोधात अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.



अनिल सावंत, सोमनाथ सावंत (दोघेही रा. विर्हाम), रोहन शिंदे, सोमनाथ शिंदे (दोघेही रा. आंबोली), महेश हांडे (रा. वांद्रे), नवनाथ गिऱ्हे (रा. भलवडी, सर्व ता. खेड) अशी गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तींची नावे आहेत. याबाबत स्वप्निल गायकवाड (वय २६) यांनी खेड पोलिसात फिर्याद दिली आहे. गायकवाड यांच्या तक्रारीनुसार शनिवारी (दि. १४) विऱ्हाम गावच्या सायबा देवाची यात्रा होती. फिर्यादी व त्यांची पत्नी हे तेथे त्यांच्या मावशीकडे गेले होते. रविवारी (दि. १५) यात्रेनिमित्त गावकऱ्यांनी ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आयोजित केला होता. फिर्यादी स्वप्निल गायकवाड हे त्यांची पत्नी श्रुती, मावशी कविता रोकडे, मावशीचा मुलगा प्रथमेश असे सर्व जण हा कार्यक्रम पाहण्यासाठी गेले होते. रात्री साडेबाराच्या सुमारास ऑर्केस्ट्रा पाहणार्या काही श्रोत्यांनी भीम गीते लावण्याचा आग्रह धरला. त्या वेळी गाणे चालू असता ऑर्केस्ट्रा पाहणार्या एका जणाने त्याच्या जवळच्या मखमलीला दगड बांधून स्टेजवर नाचणार्या महिलाच्या अंगावर फेकला आणि जातीवाचक शिवीगाळ केली. त्या वेळी स्वप्निल गायकवाड याने बाबासाहेबांचे गाणे होऊ द्या, असे सांगितल्याने त्याचा राग धरून ऑर्केस्ट्रा पाहणार्या लोकांपैकी १० ते १२ जणांनी येऊन त्याला हाताने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. स्वप्निलची पत्नी व मावशी हाणामारी सोडवण्यासाठी आल्या असता त्यांनाही त्याच पद्धतीने मारहाण झाली. या मारहाणीमध्ये स्वप्निल गायकवाड, त्याची पत्नी श्रुती, मावशी कविता रोकडे असे गंभीर जखमी झाले. या दरम्यान झालेल्या झटापटीत श्रुती गायकवाड हिचे गळ्यातील मंगळसूत्र कोणीतरी हिसकावले. मारहाणीत जखमी झालेल्या स्वप्निल गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मारहाण करणार्या चार गावातील सात आणि इतर चार असे ११ जणांच्या विरोधात अॅट्रोसिटीसह विविध कलमांनुसार गुन्हा नोंदविला आहे. दरम्यान पोलिसांनी वाळके ऊर्फ सोमनाथ दत्तात्रय सावंत, नवनाथ नामदेव गिर्हे यांना अटक केली असून, त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे, तर एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले आहे.

# खूनाच्या प्रयत्नातील सराईताला पळून जाताना पकडले



पुणे – खूनाच्या प्रयत्नातील सराईत गुन्हेगार एसटी स्थानकातून पळून जाण्याच्या तयारीत असताना स्वारगेट पोलिसांनी त्याला जेरबंद केले आहे. त्याच्याविरूद्ध भारती विद्यापीठ, येरवडा, विश्रांतवाडी, कोंढवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अपहरण, खूनाचा प्रयत्न, जबरी चोरी, गंभीर व अतिगंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. नुकताच तो स्थानबध्देतून मुक्त होवून शहरात आला होता. अमोल रवी आडम (वय २४ रा. शंकरनगर, प्रथमेश अपार्टमेंट कात्रज) असे अटक केलेल्याचे नाव आहे.

गुन्हा केल्यानंतर सराईत अमोल आडम हा १७ डिसेंबरला मुळगावी सोलापूरला जाणार आहे. तो स्वारगेट एसटी स्टॅण्ड येथून पळून जाणार असल्याची माहिती पोलीस हवालदार कुंदन शिंदे आणि शिपाई राहुल तांबे यांना मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने स्वारगेट एसटी स्थानकातून सराईताला ताब्यात घेतले. त्याने १७ डिसेंबरला साथीदारांच्या मदतीने आंबेगाव कात्रज परिसरात दोघांवर शस्त्राने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली. ही कामगिरी उपायुक्त स्मार्तना पाटील, सहायक पोलीस आयुक्त दिपक निकम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे, सहायक पोलीस निरीक्षक राहुल कोळंबीकर, संजय भापकर, शंकर संपते, सागर केकाण, श्रीधर पाटील, सुधीर इंगळे, सतिश कुंभार, विक्रम सावंत, रफिक नदाफ, शदर गोरे यांनी केली.

# शिक्रापूर येथे ४०० कुत्र्यांची नसबंदी; रेबीज लसीकरण देखील पूर्ण

शिक्रापूर । प्रतिनिधी

शिक्रापूर (ता. शिरूर) येथे नुकतेच ४०० कुत्र्यांची नसबंदी व रेबीज लसीकरण पूर्ण झाले आहे. यामुळे सर्व स्तरातून ग्रामपंचायतीचे कौतुक होत आहे. भटक्या मोकाट कुत्र्यांच्या सर्वच नागरिकांना त्रास आहे. काही अपघातदेखील घडले आहेत. यात रेबीज सदृश्य श्वानसुद्धा आढळले आहेत.

शिक्रापूरचे सरपंच रमेश गडदे, ग्रामविकास अधिकारी शिवाजी शिंदे, उपसरपंच पूजा भुजबळ, माजी उपसरपंच सारिका सासवडे यांच्या प्रयत्नातून पेट्स फोर्स (एनजीओ) बकोरी येथे तब्बल ४०० कुत्र्यांची नसबंदी आणि लसीकरण करण्यात आले. शिरूर शहरात दोन वर्षांपूर्वी दहा वर्षांच्या मुलाला मृत्यूला



सामोरे जावे लागले होते. हा मृत्यू रेबीजने झाला होता, तर नुकतेच करडे गावामध्ये एक मुलगा रेबीजने दगावला. आपल्या परिसरात असा कोणताच प्रकार होऊ दिला जाणार नाही आणि हा उपक्रम दर सहा महिन्यांनी राबवला जाईल, असे आश्वासन सरपंच गडदे यांनी दिले. गटविकास अधिकारी महेश डोके यांनी सांगितले की, शिरूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना कुत्र्याची नसबंदी व रेबीज लसीकरणाचे आदेश दिलेले आहेत. त्याचबरोबर रेबीजबद्दल जागरूकता हा सर्व शाळांमध्ये उपक्रम राबवावा.

पिसाळलेला कुत्रा असेल तर ग्रामपंचायतीने त्याला एनजीओकडे पाठवावे. पेट्स फोर्स एनजीओचे विनोद साळवी यांची संस्था गेले ७ वर्षांपासून या परिसरात कार्य करत असून, डॉ. ज्योति खडे यांच्या मदतीने रोजच जखमी, आजारी, कॅन्सरग्रस्त, ट्युमरग्रस्त श्वान तेथे आणले जातात, असे सांगितले. रेबिस लसीकरण व नसबंदी हे खुप जास्त गरजेचे आहे. यामुळे कुत्र्यांची संख्या आटोक्यात येते आणि ते शांत होतात. शिक्रापूर ग्रामपंचायतचे कार्य कौतुकास्पद असून, असे निर्णय सर्वच ग्रामपंचायतीने घ्यायला हवा तरच आपला देश रेबिजमुक्त होईल, असे मत डॉ. रवींद्र टेमगिरे, डॉ. पवन सोनवने यांनी व्यक्त केले.

# डान्स टीचरकडून लैंगिक अत्याचार प्रकरण, नामांकित शाळेच्या संस्थाचालकाला अटक

पुणे : पुण्यातील नामांकित शाळेतील अल्पवयीन मुलांवर डान्स टिचरकडून लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा प्रकार समोर आला होता. दरम्यान, या प्रकरणी आता पोलिसांनी शाळेच्या संस्थाचालकाला अटक केली आहे. दोनअल्पवयीन मुलांचा डान्स टिचरने लैंगिक छळ केल्याप्रकरणी नामांकित शाळेच्या संस्थाचालकाला अटक करण्यात आली आहे. अन्वित पाठक अस संस्थाचालकाच नाव आहे. या प्रकरणात हलगर्जीपणा केल्याने वारजे पोलिसांनी (झ्रींपश झे–श्रळलश) संस्थाचालकाला ठोकल्या बेड्या ठोकल्या आहेत.

पुण्यातील कर्वेनगर परिसरात एका शाळेत आरोपी मंगेश साळवे हा डान्स टीचर म्हणून कार्यरत होता. नृत्य शिकवत असताना साळवे हा शालेय विद्यार्थ्यांच्या शरीराला जाणून बुजून हाथ लावत असे. एका ११ वर्षीय विद्यार्थ्याने







त्याच्याबाबत घडलेला प्रकार समुपदेशन सुरू असताना सांगितला आणि त्यानंतर त्याच्या आई वडिलांना देखील याबाबतची माहिती दिली आणि तात्काळ त्यांनी पोलिसात धाव घेतली. पोलिसांनी सुद्धा प्रकरण गांभीर्याने घेत शिक्षक मंगेश साळवे याला अटक केली. यापूर्वी सुद्धा त्याने इतर विद्यार्थ्यांवर लैंगिक छळ केल्याचे समोर आल होतं. आरोपीवर अशा प्रकारचा गुन्हा केल्याप्रकरणी आणखी एका गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चौथी आणि सहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोबत हा प्रकार घडला आहे. शाळेतील एक शिक्षक हा २०२२ पासून कॉन्ट्रॅक्ट बेसिस वर कार्यरत आहे. काल तक्रार येताच आम्ही तात्काळ या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आरोपीला अटक केली आहे. आम्ही त्याची वैद्यकीय तपासणी करत आहोत तसेच शाळेतील ज्या विद्यार्थ्यांच्या बाबत हा प्रकार घडला आहे त्यांचे देखील स्टेटमेंट घेतली आहेत, अशी माहिती पोलीस उपयुक्त संभाजी कदम यांनी दिली. हा सगळा प्रकार शाळेत सुरू असलेल्या समुपदेशनमुळे समोर आला. शाळेच्या मधल्या वेळेत आरोपीने हे कृत्य केलं आहे. याप्रकरणात २ वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत. वारजे पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला असून पुढील कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.